शुक्रवार, ९ फेब्रुवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १७२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 9 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-172 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# श्वेतपत्रिकेत यूपीए काळातील अर्थव्यवस्थेचे वाभाडे

## अर्थमंत्री सीतारमण यांनी सादर केली श्वेतपत्रिका

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी गुरूवारी लोकसभेत श्वेतपत्रिका सादर केली. भारतीय अर्थव्यवस्थेशी संबंधित ही श्वेतपत्रिका आहे. १ फेब्रुवारी रोजी त्यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. त्यानंतर १० वर्षांच्या कार्यकाळात झालेल्या आर्थिक प्रगतीची श्वेतपत्रिका लोकसभेत सादर करण्यात आली. श्वेतपत्रिकेत उल्लेख आहे की, यूपीएच्या काळात देशाचा आर्थिक पाया खिळखिळत केला. भारतात रुपया घसरला तोदेखील यूपीएच्या काळातच. २०१४ च्या आधी देशाच्या बँकिंग सेक्टरवर मोठे संकट आले होते. यूपीए सरकारने मिळालेल्या महसुलाचा चुकीचा वापर केला. असा उल्लेख करत या श्वेतपत्रिकेत यूपीए सरकारचे वाभाडे काढण्यात आले आहे.**



निर्मला सीतारामण म्हणाल्या की, मी आज भारतीय अर्थव्यवस्थेची श्वेतपत्रिका हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये पटलावर ठेवते आहे. तसेच २०१४ च्या आधी देशाची अर्थव्यवस्था संकटात होती, असाही उल्लेख श्वेतपत्रिकेत आहे. यूपीएचा दहा वर्षांचा कार्यकाळ नॉन परफॉर्मिंग होता असाही उल्लेख या श्वेतपत्रिकेत करण्यात आला आहे. या श्वेतपत्रिकेवर शुक्रवारी चर्चा होणार आहे. तसेच राज्यसभेत शनिवारी चर्चा होईल. श्वेत पत्रिकेद्वारे हे सांगण्यात आले की, २०१४ नंतर मोदी सरकारला कुठल्या आव्हानांचा सामना करावा लागला. तसेच या आव्हानांचा सामना करुन अर्थव्यवस्था कशी रुळावर आणली, याचा उल्लेखही श्वेतपत्रिकेत उल्लेख आहे. श्वेतपत्रिकेत कोळसा घोटाळ्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. २०१४ मध्ये मोदी सरकार येण्याआधी कोळसा घोटाळा झाला. त्या घोटाळ्याने संपूर्ण देशात खळबळ उडाली. सरकारच्या श्वेतपत्रिकेत हा उल्लेख आहे की २०१४ मध्ये एनडीएकडे सत्ता आली तेव्हा देशाची अर्थव्यवस्था फक्त वाईट स्थितीत नव्हती तर संकटात होती. आम्हाला संकटग्रस्त अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी दहा वर्षांचा कालावधी लागला.

# सहाव्यांदा व्याजदर जैसे थे, महागाई आरबीआयच्या प्राधान्यक्रमावर : दास



रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अर्थात RBI चे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज रेपो रेटसंदर्भात घोषणा केली. सहाव्यांदा आरबीआयनं रेपो रेट जैसे थे ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे यावेळीही रेपो रेट ६.५ टक्के इतका स्थिर राहणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या मॉनेटरी पॉलिसी कमिटीनं यासदंर्भातील निर्णय घेतल्याचे जाहीर करण्यात आले आहे. कमिटीतील ६ सदस्यांपैकी ५ सदस्यांनी व्याजदर जैस थे ठेवण्याच्या बाजूने मत दिल्यानंतर हा निर्णय अंतिम करण्यात आला. दरम्यान, यावेळी महागाई हा प्राधान्यक्रम असल्याची बाब शक्तीकांत दास यांनी अधोरेखित केली. रिझर्व्ह बँकेच्या मॉनेटरी पॉलिसी कमिटीनं करोना काळात अर्थव्यवस्थेमध्ये अधिक पैसा खेळता राहावा यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना कमी करण्यावर भर देण्यास एकमत दर्शवलं आहे. आर्थिक विकासाला हातभार लावतानाच महागाई नियंत्रणात आणण्यासाठी यामुळे मदत होईल, असे शक्तीकांत दास पत्रकार परिषदेत म्हणाले. दरम्यान, यावेळी गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी पुढील आर्थिक वर्षासाठीच्या महागाई दरावरही भाष्य केले. पुढच्या आर्थिक वर्षात महागाईचा दर ४.५ टक्क्यावंर राहण्याचा अंदाज आहे. पहिल्या तिमाहीत ५ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ४ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ४.६ टक्के तर चौथ्या तिमानीह ४.७ टक्के दर राहील", असा अंदाज शक्तीकांत दास यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकास दर ७ टक्के इतका असेल, असाही अंदाज रिझर्व्ह बँकेने व्यक्त केला आहे.




# माजी मंत्री बाबा सिद्दीकींचा काँग्रेसला रामराम

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** महाराष्ट्रात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांनी काँग्रेसला रामराम केला आहे. बाबा सिद्दीकी यांनी ट्विट करून पक्षाला रामराम केल्याची घोषणा केली. सिद्दीकी यांनी ट्विट करून म्हटले आहे की, मी तरुणपणी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. 48 वर्षांचा हा एक महत्त्वाचा प्रवास आहे. आज मी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा तत्काळ प्रभावाने राजीनामा देत आहे. मला व्यक्त करायचे आहे असे बरेच काही आहे, परंतु या म्हणीप्रमाणे काही गोष्टी न सांगितल्या जातात. मी जिथे जाईन तिथे पक्षासोबत पीसी घेईन. 10 तारखेला एक सभा होईल, माझ्याबरोबर असणारे लोक त्यामध्ये येतील. अजित पवार हे कौतुकासारखेच आहेत. अजित पवार आपल्या सर्व लोकांकडे लक्ष ठेवतात हे त्यांचे मोठेपणा आहे, आगे आगे देखो होता है क्या असेही ते सिद्दीकी म्हणाले.

# सर्वे : महाविकास आघाडीची महायुतीवर मात

## मविआला 48 पैकी 26 जागा जिंकण्याचा अंदाज

आधुनिक केसरी न्यूज









मुंबई : राज्यात महायुतीकडून अब की बार 45 पार असा नारा देण्यात येत असला, तरी परिस्थिती चिंताजनक असल्याचे चित्र आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत महायुती विरुद्द महाविकास आघाडी असाच सामना रंगणार आहे. या पार्श्वभूमीवर मूड ऑफ द नेशन सर्वेक्षणात महाराष्ट्रातील धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. सर्वेक्षणात महाविकास आघाडीने भाजप-शिंदे-अजित पवार गटावर मात केल्याचे दिसत असून विरोधी आघाडीला 48 पैकी 26 जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. भाजप महायुतीला 40.5 टक्के मते तर काँग्रेस आघाडीला 44.5 टक्के मते मिळत असल्याचे दिसत आहे. सर्वेक्षणानुसार आज भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांची युती एकत्र निवडणूक लढवल्यास त्यांना 40.5 टक्के मते मिळतील. मूड ऑफ द नेशन सर्वेक्षणा लोकसभेला महाराष्ट्रात 48 पैकी भाजपला 22 जागा, काँग्रेसला 12 जागा, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) 14 जागा मिळतात. शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) यांना 6 जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आणि अजित पवार एकत्र येऊन भाजपला विशेष फायदा होताना दिसत नाही. भाजप महायुतीला 40.5 टक्के, काँग्रेसच्या महाविकास आघाडीला 44.5 टक्के तर इतरांना 15 टक्के मते मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**संजय राऊतांचा दावा** : या सर्वेक्षणावर शिवसेना (यूबीटी) नेते संजय राऊत म्हणाले की, महाविकास आघाडी एकत्रितपणे 48 पैकी 35 जागा जिंकणार आहे. प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत निवडणूक लढवणार आहोत. आपण सर्वांनी मिळून 30-35 जागांच्या पुढे जायचं आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेना एकत्र लढले होते. महाराष्ट्रातील लोकसभेच्या 48 जागांपैकी भाजपने 23 आणि शिवसेनेने 18 जागा जिंकल्या होत्या. भाजपला 28 टक्के तर शिवसेनेला 23 टक्के मते मिळाली. एकूण 51 टक्के मतांसह एनडीएने येथे 41 जागा जिंकल्या होत्या. मात्र, शिवसेनेत फूट पडल्यानंतर 12 जागा शिंदे गटाकडे तर 6 जागा उद्धव ठाकरे गटाकडे आहेत.

**महाराष्ट्रातील गेल्या निवडणुकीची आकडेवारी** : महाराष्ट्रात लोकसभेच्या 48 जागा आहेत. त्यापैकी एनडीएने 2019 च्या निवडणुकीत 41 जागा जिंकल्या. त्यापैकी 22 जागा भाजपने, तर शिवसेनेने 19 जागा जिंकल्या. तेव्हा शिवसेना फुटली नसून एकच पक्ष होता. याशिवाय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र निवडणूक लढवली होती. त्यापैकी सहा जागा जिंकल्या. त्यापैकी राष्ट्रवादीला चार, तर काँग्रेसला केवळ एक जागा मिळाली. तर औरंगाबादमध्ये ओवेसींच्या पक्ष एआयएमआयएमचे उमेदवार विजयी झाले होते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

काही अपवाद जरूर असतील पण हे चित्र मोठ्या प्रमाणावर दिसू लागले. स्वातंत्र्यानंतर देशाने प्रगती केली. अनेक क्षेत्रात. औद्योगिक प्रगती झाली, धरणे बांधली गेली, रस्ते झाले, वीज, एस टी बस ग्रामीण भागात पोहोचली. माणूस चंद्रावर जाऊन पोहोचला, मोलकरणीच्या, गुराख्याच्या हातात मोबाईल आला. म्हटलं तर केवढी क्रांती, केवढी प्रगती ! पण सर्वसामान्य माणूस निर्भय झाला का ? जगातील मोठी लोकशाही असा लौकिक असलेल्या या देशात निवडणुका लोकशाही मार्गाने तर होऊ लागल्या. पण निवडणूक कशी जिंकायची याचे एक तंत्र तयार झाले. जाती, धर्माचा वापर करून घेतला जाऊ लागला. त्यालाच बहुमताचा कौल असे सुरेख नाव दिले गेले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात व्यासपीठावर गांधीजींचे गुणगान, सरकारी कार्यालयात, संसदेत, विधानसभेत नोटेवर इ ठिकाणी गांधीजींची प्रतिमा झळकू लागली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सत्याचा आग्रह, अहिंसा आदी गांधीजींची तत्वे फक्त बोलण्यापुरती उरली. गांधीजी जेव्हा जेव्हा स्वराज्याबद्दल बोलत तेव्हा सुराज्य आणि रामराज्य त्यांना अपेक्षित असे. रामराज्य या शब्दाचा अनेकदा उच्चार ते करीत असत. रामराज्य लोकांच्या मनातील निर्भयता स्वातंत्र्य आणि उच्च नीती मूल्ये या गोष्टी अंतर्भूत होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात मनामनावर राज्य करणारा महात्मा फोटोपुरता उरला. पु लं देशपांडे यांच्या ' खिल्ली ' या पुस्तकात ' एका गांधी टोपीचा प्रवास ' या नावाचा एक लेख आहे. त्यात एक प्रसंग वर्णन केला आहे. गांधी चळवळीत सामील झालेल्या एका ज्येष्ठ नेत्याला पुलं विचारतात की गेल्या पंचवीस वर्षात सर्वात मोठे परिवर्तन कशात झाले असे तुम्हाला वाटते ? तेव्हा ते उत्तरले, ' गांधी टोपीत. पूर्वी गांधी टोपी घालताना इंग्रज सरकारची भीती वाटत होती. आता आपल्याच लोकांची वाटते. खाडीच्या कपड्याकडे, टोपीकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोनच बदलला आहे. ' असे म्हणून त्यांनी एक प्रसंग सांगितला. मिठाच्या सत्याग्रहाचे दिवस होते. लॅमिंग्टन रोडवर पोलीस स्टेशनजवळ लोक पोलिसांच्या गाडीत शिरून स्वतःला अटक करून घेत होते.






## आनंदी पहाट

### प्राप्त परिस्थिती स्वीकारून भविष्य उज्ज्वल करावे

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवले तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणीचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचे, ह्याचे कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही. खरे म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थितीनुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने विचार केला पाहिजे. आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनाने बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही, केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो. खरे म्हणजे, नशिबाच्या खेळामुळे नाराज होऊ नये. जीवनांत काहीही झालं तरी उदास होऊ नये. हातांवरच्या रेषांवर कधी भविष्य पाहू नये आणि विश्वासही ठेवू नये. कारण, भविष्य तर त्यांना देखील असते, ज्यांना हातच नसतात. आपल्या नशिबातले योग आपणच आणायचे असतात. त्यासाठी हातापेक्षा सकारात्मक विचार आवश्यक असतात. आपले विचार बदलेले तर नशीब बदलतेच.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

असं म्हंटले जाते, कि प्रारब्धातील भोग आणि नशिबातील योग कधीही चुकवता येत नसतात. परंतू ह्या दोन्हींचा संबंध आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांशी निगडीत असतो.



आधुनिक केसरी

### धन्य झाला दास | ज्ञानाईचा ||

माय इंद्रायणी | काय गुण गाऊ ||
घातलेस न्हाऊ | ज्ञानाईला ||१||
योगिययांचा गुरू | विश्वाची माऊली ||
तूचि सांभाळली | ज्ञानेशाला ||२||
तुझ्या उदरीचे | प्राशुनी अमृत ||
विठ्ठलाचा पुत | ज्ञानयोगी ||३||
तुझ्या तीरावर | संजीवन झाला |
पांग फेडियला | धन्य ज्ञाना ||४||
रांगत रांगत | आलो तुझ्या तीरी ||
गावली शिदोरी | जन्माची ह्या ||५||
तुझ्याच कुशीत | संतांचा निवास ||
धन्य झाला दास | ज्ञानाईचा ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना ।
स्वर्गनरकादिं भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम् ॥३ ॥
येक ताप आध्यात्मिक ।दुजा तो आदिभूतिक ।
तिसरा आदिदैविक ।ताप जाणावा ॥९॥
आध्यात्मिक तो कोण ।कैसी त्याची वोळखण ।
आदिभूतिकांचें लक्षण ।जाणिजे कैसें ॥१०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पञ्च प्राण मिल प्राण मय,
प्राणन कर व्यवपार ।
जग जीवन सो प्राण है, प्राण विना
संघार ।।४७।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/४७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
पंचप्राणांद्वारेच शरीराचा सर्व व्यवहार चालतो. समस्त नल-चक्र प्राणांद्वारेच चालतात. सर्व जगाचे जीवन प्राणामुळेच आहे. याच्या शिवाय जीवनाचा विनाश होतो. प्राणाच्या आधारावरच शरीराच्या सर्व क्रिया होतात. हे पंचप्राण मिळून प्राणमय कोश होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## जाणपणनिरूपण

आधुनिक केसरी

त्यामुळे आपलेचं नुकसान होते. अज्ञानामुळे नरसंहार होतो व अनेक जीवांची हत्या केल्याचे पाप माथी चिकटते. अज्ञानी माणसाला आपलं हित कशात आहे ते समजत नाही. कोणतेही चतुरस्त्र ज्ञान नसल्यामुळे त्यांचा गैरफायदा इतर लोक घेतात. त्यामुळे अधोगती प्राप्त होते घरादारावर वाईट वेळ येते हे होऊ नये म्हणून ज्ञानवंत असणे आवश्यक आहे. जन्ममरण नाहीसे कसे करावे माया व ब्रम्ह,जीव आणि शिव, सार आणि असार, भाव व अभाव यांचे ज्ञान वाढवले मनामध्ये सतत ठेवले, समाजात रूजवले ज्ञानाची जोपासना सर्वांना करून दिली तर माणसाची जन्म मरणाच्या फे-यातून सुटका होते आणि मुक्ती मिळते. देव निर्गुण निराकार निर्विकार आहे त्याचे ज्ञान समजून उमजून घ्यावे. यासाठी संतवचनावर विश्वास ठेवावा. व्यावहारिक पातळीवर आपले ज्ञान वाढवले व मिथ्या गोष्टींना जास्त महत्त्व दिले नाही तर ज्ञानवंत होण्यासाठी वेगळा प्रयत्न करावा लागत नाही. आपल्यातील "मी"पणा नाहीसा झाला की ज्ञान मिळवण्यासाठी पुढची पायरी गाठता येते. आपल्याला जेव्हा ज्ञानमार्ग सापडतो तेव्हा ज्ञानाच्या एका टोकास जाणणारा ज्ञाता किंवा "मी" असतो. तर दुसरीकडे ज्ञान समजून घेण्यासाठी व ज्ञानाच्या समोर ज्ञेय रूपाने येणारे दृष्य रूपात येते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## संत एकनाथ


आधुनिक केसरी

सर्वसाधारणपणे नाथ म्हणून ओळखले जाणारे संत एकनाथ (जन्म : पैठण, इ.स. १५३३; - इ.स. १५९९) हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातले एक संत होते. त्यांचा जन्म इ.स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. संत भानुदास हे एकनाथांचे पणजोबा. ते सूर्याची उपासना करीत. श्री संत एकनाथांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण होते. आईचे नाव रुक्मिणी होते. आई-वडिलांचा सहवास त्यांना फार काळ लाभला नाही. एकनाथांचे पालनपोषण आजोबांनी केले.

## प्रपंचातले सुख-दु:ख हे केवळ जाणिवेत आहे

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला



समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.

**८७. वासना म्हणजे देवाच्या विरूद्ध असलेली आपली इच्छा.**


पोलीसासह माजी सभापतींना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न
शासकीय कामात अडथळा व दंगलीचे गुन्हे
पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ९ फेब्रुवारी २०२४


# रेती तस्करांना अभय; तहसीलदार जयस्वालांची चौकशी करा

## अ. भा. ग्रा. पत्रकार संघाची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्र मोरे**

**चिखली :** खडकपूर्णा नदीपात्रामधून काही महिने अधिकृत पासवर रेती विक्री सुरू होती. रात्रीच्या वेळेला मलकापूर पांगरा शेंदुर्जन साखरखेर्डा या भागामध्ये विना नंबर रेतीचे टिप्पर अवैधपणे चालू होते.चौफुलीवर अवैध रेती वाहतूक करणाऱ्या मार्फत एक हेर ठेवल्या जात होता तो हेर कोण आले कोण गेले यांचे संपूर्ण माहिती द्यायचा. विना नंबरचे टिप्पर मलकापूर पांगरा मधून भरधाव वेगाने जात असल्यामुळे अनेकदा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला होता स्थानिक लोकांनी गोपनीय माहिती दिल्यामुळे मलकापूर पांगरा येथील दैनिक महाभुमी तसेच चौफेर बुलढाणा चे मुख्य संपादक गंगाराम उबाळे यांनी दिनांक 23 डिसेंबर रोजी गावातून अवैध रेती वाहतूक सुरू असल्याची माहिती सिंदखेड राजा तहसीलदार सचिन जयस्वाल यांना मोबाईल वरून दिली होती .परंतु याकडे तहसीलदार जैस्वाल यांनी कानाडोळा केला .त्यानंतर दिनांक 26 जानेवारी रोजी गंगाराम उबाळे यांनी दैनिकांमधून अवैध रेती वाहतूक असल्याची बातमी प्रकाशित केली .त्यानंतर दुसऱ्या दिवशीही अवैध रेती विना नंबरच्या टिप्पर सुरू असल्याची माहिती उबाळे यांनी तहसीलदार यांना दिले .परंतु सिनखेडराजा तहसीलदार सचिन जयस्वाल यांनी कुठलेही म्हणणे ऐकून न घेता पत्रकार गंगाराम उबाळे यांना दूरध्वनीवरून फोन करून उरमटपणाची भाषा वापरून तुम्ही पत्रकार लोक फालतुगिरी करता असे म्हटले . शिवाय तुम्हा पत्रकारांना कुठलेही काम धंदे नसून माझे काहीही वाकडे होत नाही असे म्हटले . त्यामुळे तहसीलदार सचिन जैस्वाल यांनी पत्रकार उबाळे यांच्याशी कोरमटपणाची भाषा वापरून एक प्रकारे पत्रकारांचा अवमान केला आहे.





## विलास पवार राजपत्रित अधिकारीपदी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील मुर्शिदाबाद वाडी येथील शेतकरी कुटुंबातील विलास गुणाजी पवार यांची नुकतीच मुंबई न्यायालयात राजपत्रित अधिकारी( वर्ग 1 ) म्हणून निवड झाली. जेमतेम दोन एकर जमिनीचे क्षेत्र असलेले व चौथीचे शिक्षण चालू असताना वडिलांचे छत्र हरपलेले विलास पवार शिक्षणाची कस धरून जिल्हा परिषद शाळेत इयत्ता नववी पर्यंत शिक्षण फुलंब्री तालुक्यातील पूर्ण गावातच केले. पुढील शिक्षण 2014 जिल्हा सत्र न्यायालयात लिपिक पदी निवड झाली. त्यांनी लिपिक पदावर समाधान न मानता आता नुकतीच त्यांची मुंबई उच्च न्यायालय यांच्या आस्थापना विभागात राजपत्रिका अधिकारी नियुक्ती झाली. भांडेगाव येथील शेतकऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. प्रसंगी रावसाहेब चव्हाण, पुंडलिक चव्हाण सुनील चव्हाण, जनार्दन चव्हाण, रामेश्वर चव्हाण, किशोर वेताळ मांजाराम तांदळे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## तक्रार मागे घेत नसल्याने तरूणाचा खून

### रक्तरंजित खूनाचा घटनेने उल्हासनगर हादरले

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** मोटरसायकल जाळल्याची केलेली तक्रार मागे घेत नसणाऱ्या तरुणाला प्रथम जीवे ठार मारण्याची धमकी दिल्यावर आणि या धमकीची तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात जात असलेल्या तरुणाच्या डोळ्यात मिरची स्प्रे आणि डोक्यात लादी घालून त्याचा खून करण्यात आल्याची घटना घडली आहे.

पहाटे-पहाटेच मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून पहाटेच्या या रक्तरंजित खूनाचा घटनेने उल्हासनगर हादरून गेले आहे. उल्हासनगर कॅम्प क्रमांक 3 येथील इमलीपाडा परिसरात राहुल जयस्वाल हा 25 वर्षीय तरुण राहत असून त्याचे याच भागात राहणाऱ्या बाबू ढकणी आणि त्याच्या साथीदारांसोबत अनेक वर्षांपासून वाद सुरु होते.याच वादातुन बाबू ढकणी याने नोव्हेंबर 2022 मध्ये राहुल याची दुचाकी देखील जळाली होती.या प्रकरणात पोलिसांनी बाबूला अटक केली होती.यामुळे दोघांमधील संघर्ष आणखीच वाढला होता. पहाटेच्या सुमारास बाबू ढकणी याच्यासह बसंत ढकणी,प्रणय शेट्टी,करण ढकणी,संतोष साळवे,प्रफुल कुमावत,रॉबिन करोतिया यांनी राहुलच्या घरावर दगडफेक केली. आणि दुचाकी जाळल्याची पोलीस ठाण्यात केलेली तक्रार मागे घेतली नाही तर जीवे ठार मारणार अशी धमकी दिली.राहुलने नकार दिला आणि तो मध्यवर्ती पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी जात असतानाच आरोपींनी राहुल याला गाठून बेदम मारहाण केली.तसेच त्याच्या डोळ्यात मिरची स्प्रे आणि डोक्यात लादी घालून त्याचा खून केला.या प्रकरणात पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे,सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल कोळी,वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने विविध ठिकाणी छापे मारून बसंत ढकणी,प्रणय शेट्टी आणि संतोष साळवे या तीन जणांना अटक केली आहे. या प्रकरणातील फरार आरोपी रॉबिन करोतिया याला उल्हासनगर शहरातून तडीपार करण्यात आले होते.दरम्यान जुन्या वादातुन माझ्या मुलाचा खून करण्यात आला असून जो पर्यंत सर्व आरोपीना अटक करण्यात येत नाहीं,तो पर्यंत राहुलचा मृतदेह ताब्यात घेणार नाहीं अशी प्रतिक्रिया मयत राहुल जयस्वाल याच्या आईने पत्रकारांशी बोलतांना दिली.

## शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची अज्ञाताकडून स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिखलठाण परिसरात असलेले हिवरखेडा गाव तालुक्यात सतत राजकीयदृष्ट्या चर्चेत असणारे गाव होते परंतु आता अज्ञात शिवभक्तांनी रात्रीतून छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा स्थापन केल्याने तालुक्यात चर्चेत आले आहे. काल रात्री गावात मंदीरासमोरील मोकळ्या जागेवर गावकऱ्यांची खूप दिवसाची शिवरायांचे पुतळा उभारण्याची कामना अज्ञात शिवभक्तांनी पूर्ण केली असता सकाळी पाच वाजेपासून परिसरातील महिला पुरुष व बाल शिवभक्तांनी पूजन करून समाधान व्यक्त केले. पोलीस प्रशासनास माहिती मिळताच गावात भेट देवून सर्व सुरळीत असल्याचे खात्री केली. गावकऱ्यांनी पुढाकार घेत लवकरच शासकीय परवानगी घेण्याची तयारी केलीय. हिवरखेडा गावाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गावात मंदिर व मस्जीत भिंतीला भिंत बाजूस असून कधीही गावात दोन्ही समाजात जातीय वाद नाही. गावात हिंदू मुस्लीम एकोप्यांने गावगाडा चालवत असून यापुढेही समभावाने राहण्याचा निश्चय केला. परिसरात लवकरच सीसीटीव्ही कॅमेरे बसवून काळजी घेण्याचा निश्चय गावकऱ्यांनी केला. गावातील तरुण युवकांनी लवकरच ग्रामपंचायत, महसूल तसेच पोलीस प्रशासनाच्या योग्य परवानग्या घेण्याचा निर्धार केला असून त्यांना सर्वोतपरी सहकार्य करण्याचा मानस गावातील वकिलांनी व्यक्त केला. यावर्षी शिवजयंती वैचारिकरित्या साजरी कशी करता येईल याबाबत गावातील युवक विचाराधीन आहेत. सकाळी शिवरायांचे पूजनास गावातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसाइटी चेरमन व सदस्य, परिसरातील ग्रामस्थ महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या .



## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत शहर टाकळी जिल्हा परिषद शाळेचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**शहरटाकळी :** शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इयत्ता १ली ते ४थी या गटात मुलांच्या संघाने खो खो स्पर्धेमध्ये तालुकास्तरीय पातळीवर प्रथम क्रमांक मिळवला असून या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शहरटाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी गायन स्पर्धा, खोखो, कबड्डी अशा अनेक स्पर्धेत मोठे केंद्रस्तरीय पातळीवर, तालुका पातळीवर मोठे यश मिळवलेले असून नुकत्याचं झालेल्या तालुकास्तरीय पातळीवरील खो खो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला असून या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या संघाला मुख्याध्यापक आप्पासाहेब झिंजुर्के, वर्गशिक्षक रमेश गायकवाड, संजय काळे, राजाभाऊ इंगळे, आमोल बुधवंत, श्रीमती निकाळजे मडम यांचे मार्गदर्शन लाभले.विजयी संघाचे गटशिक्षणाधिकारी श्रीमती तृप्तीताई कोलते मडम, विस्तार अधिकारी पटेकर साहेब , केंद्रप्रमुख जाधव साहेब, सुभाष शेटे, शाळा व्यवस्थापन समिती यांनी अभिनंदन केले. सर्व खेळाडूंना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## मोदींचे गौरवोद्गार

आधुनिक केसरी

अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने दिल्लीत सत्ताधारी व विरोधी पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण रंगल्याचे पाहायला मिळत आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये या दोन्ही गटांकडून जोरकसपणे आपली बाजू मांडली जात आहे. बुधवारी राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्रपतींच्या भाषणावरील आभार प्रस्तावाच्या निमित्ताने केलेल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरूंवर टीका केली. त्याअनुषंगाने काँग्रेसला लक्ष्य केले. पण गुरूवारी राज्यसभेत बोलताना मोदींनी देशाचे माजी पंतप्रधान व काँग्रेसचे राज्यसभेतील ज्येष्ठ खासदार मनमोहन सिंग यांच्यासाठी गौरवोद्गार काढले. यामुळे राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राज्यसभेतील ५६ खासदारांचा कार्यकाळ संपत असून त्यानिमित्ताने या खासदारांच्या आभार प्रदर्शनाची चर्चा राज्यसभेत पार पडली. या चर्चेमध्ये दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी कार्यकाळ संपणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत आभारप्रदर्शन करताना आपली भूमिका मांडली. कार्यकाळ संपणाऱ्या सदस्यांमध्ये माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचाही समावेश आहे. यावेळी मनमोहन सिंग यांच्याबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काही महिन्यांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगाचा उल्लेख केला. लोकसभा दर पाच वर्षांनी नव्या रंगात सजते. पण राज्यसभा दर दोन वर्षांनी एक नवी ऊर्जा प्राप्त करते. त्यामुळे दर दोन वर्षांनी या सभागृहातून सदस्य बाहेर पडताना अनेक चांगल्या आठवणी मागे सोडून जातात, अशा शब्दांत मोदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. काही सदस्य सभागृह सोडून जात आहेत. असे होऊ शकते की काही लोक परत येण्यासाठी जात आहेत. तर काही लोक कायमचे जात असतील. मी डॉ. मनमोहन सिंग यांचे विशेष करून स्मरण करू इच्छितो. सहा वेळा या सभागृहात त्यांनी आपले मौलिक विचार मांडले. सभागृह नेता व विरोधी पक्षनेता म्हणूनही त्यांनी या सभागृहात खूप मोठे योगदान दिले आहे. वैचारिक मतभेद अल्पकालीन असतात. पण एवढ्या मोठ्या काळासाठी ज्या प्रकारे त्यांनी या सभागृहाला मार्गदर्शन केले, देशाला मार्गदर्शन केले, ते पाहाता जेव्हा केव्हा भारतीय लोकशाहीच्या संदर्भात काही मोजक्या लोकांची चर्चा होईल, त्यात मनमोहन सिंग यांची चर्चा नक्की होईल, अशा शब्दात मोदींनी मनमोहन सिंग यांच्यासाठी गौरवोद्गार काढले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मनमोहन सिंग व्हीलचेअरवर बसून राज्यसभेत आले त्या प्रसंगाचा उल्लेख केला. लोकसभेत काही दिवसांपूर्वी मतदानाचा एक प्रसंग होता. कशासाही हे मला आठवत नाही. हे स्पष्ट होते की, या मतदानानंतर विजय सत्ताधाऱ्यांचा होणार आहे. बाजूने व विरोधात असणाऱ्या मतांमध्ये अंतर खूप होते. पण डॉ. मनमोहन सिंग व्हीलचेअरवर आले, मतदान केले. एक खासदार आपल्या जबाबदाऱ्यांसाठी किती जागृत आहे, याचे हे प्रेरणादायी उदाहरण होते. समिती सदस्यांसाठी जेव्हा मतदान होते, तेव्हाही ते व्हीलचेअरवर आले. इथे प्रश्न हा नाहीये की ते कोणत्या पक्षासाठी आले होते. मी असे मानतो की ते लोकशाहीसाठी आले होते. त्यामुळे आज मी विशेषकरून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी सगळ्यांच्या वतीने प्रार्थना करतो. ते असेच आपल्याला मार्गदर्शन करत राहो, आपल्याला प्रेरणा देत राहो, असे मोदी म्हणाले.

## बांगलादेशी घुसखोरी थांबणार केव्हा ?



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**बांगलादेशी नागरिकांची भारतातील घुसखोरी हळूहळू उग्र स्वरूप धारण करू लागली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्सने त्याच्या सीमा शरणार्थींसाठी खुल्या केल्या होत्या त्याचे परिणाम म्हणून ४० वर्षानंतर फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणात दंगली उसळल्या. भारतातील घुसखोरीवर आज गांभीर्याने उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात भारतालाही अशा प्रकारच्या संकटाला सामोरे जावे लागू शकते. आजमितीला मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यांसारख्या प्रमुख शहरांत बांगलादेशी नागरिकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. गुन्हेगारी क्षेत्रातही बांगलादेशी नागरिकांचा मोठा भरणा आहे.**



प्रमुख शहरांसह देशाच्या सुरक्षिततेसाठीही हे अत्यंत घातक आहे. बांगलादेशी नागरिकांची भारतातील घुसखोरी आजमितीला जटील समस्या बनली आहे. बांगलादेशी घुसखोरांनी आसामच्या हजारो चौरस किलोमीटर परिसरावर अतिक्रमण केले आहे या परिसरात कारवाईसाठी जाणाऱ्या अतिक्रमणविरोधी पथकांना आणि पोलिसांना ते जुमानत नाहीत, बांगलादेश सीमेलगतच्या सर्वच राज्यांत जवळपास अशीच परिस्थिती आहे. पश्चिम बंगाल तर बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देणारे प्रमुख राज्य मानले जाते. अर्थात हे बांगलादेशी अधिककाळ या सीमेलगतच्या भागांत राहत नाही. सीमेलगतच्या भागांत या बांगलादेशींना भारतीय नागरिकत्वाची सरकारी कागदपत्रे मिळवून देणाऱ्या अनेक टोळ्या अनधिकृतरित्या कार्यरत आहेत. सरकारी कागदपत्रे बनवल्यावर हे घुसखोर भारतभरातील प्रमुख शहरांमध्ये जाऊन आपले बस्तान मांडतात. विकसनशील शहरे हे या घुसखोरांची प्रमुख आश्रयस्थाने आहेत. विकसनशील शहरांत मोठमोठ्या इमारतींची कामे सातत्याने चाललेली असतात. या ठिकाणी कमी रोजंदारीत काम करणारे बिगारी कंत्राटदारांना हवेच असतात. बांगलादेशी घुसखोर त्यांची ही गरज भागवतात. इथेच यांच्या निवाऱ्याची सोयही केली जाते. एकदा बस्तान बसले कि हे लोक आपल्या संपूर्ण कुटुंबियांना घेऊन त्या ठिकाणी येतात. नवी मुंबई, पुणे, ठाणे, मुंबई या शहरांमध्ये बांगलादेशी घुसखोरांची संख्या याच पद्धतीने वाढली आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तरेकडील काही भागांत जिथे मोठ्या प्रमाणात कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने शेती केली जाते अशा ठिकाणीही या घुसखोरांना सहज रोजगार उपलब्ध होतो. प्रमुख शहरांमध्ये या बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देणाऱ्या, त्यांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या आणि व्यवसायासाठी भांडवल मिळवून देणाऱ्या टोळ्याही कार्यरत आहेत. आजच्या घडीला मुंबई शहरातील बहुतांश रेल्वे स्थानकानजीकच्या मंडयांमध्ये घुसखोरांनी अनधिकृत टपऱ्या थाटल्या आहेत ज्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी, भ्रष्ट पोलीस अधिकारी आणि पालिका कर्मचारी यांच्याकडून संरक्षण मिळते आहे.

भारत आणि बांगलादेश यामधील सुमारे २८०० किलोमीटर सीमेवर भारताने काटेरी तारांचे कुंपण बसवले आहे तरीही आजतागायत ६ कोटीहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी भारतात घुसखोरी केल्याचा अंदाज जाणकार वर्तवतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत असताना सीमा सुरक्षा दलातील अधिकारी काय करत आहेत ? याचीही चौकशी होणे आज गरजेचे आहे. भारतातील मुस्लिमांची श्रद्धास्थाने असलेल्या मशिदी आणि दर्गे यांच्या उत्सवांच्या निमित्ताने भारतात येणाऱ्या बांगलादेशींपैकी अनेक जण पुन्हा त्यांच्या देशात जातच नाहीत असेही आता उजेडात आले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत नुकतेच भारताने चीनला मागे टाकून जगात पहिला क्रमांक पटकावला ज्यामध्ये दुर्दैवाने बांगलादेशी घुसखोरांचाही महत्वाचा वाटा आहे. भारतातील गुन्हेगारी क्षेत्रातही बांगलादेशी घुसखोरांचा मोठ्या प्रमाणात भरणा आहे. भारतात राहून देशविरोधी कारवाया, अमली पदार्थांची तस्करी, दंगली घडवणे, लूटमार करणे, भूखंड बळकावणे यांसारख्या गुन्ह्यांमध्ये बांगलादेशी नागरिक पोलिसांच्या हाती सापडत आहेत. झोपडपट्टी दादा, लोकप्रतिनिधी आणि दलाल यांच्या मदतीने या घुसखोरांच्या निवाऱ्याची आणि रोजगाराची सोय होते. काही दिवसांतच त्यांना बनावट मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड बनवून मिळते त्यामुळे बांगलादेशी असल्याचा संशय असूनही त्यांच्यावर कारवाई करणे पोलिसांना अवघड जाते. खरेतर बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी रोखावी यासाठी विशेष शोधमोहीम प्रत्येक पोलीस ठाण्याअंतर्गत राबवण्यात यावी, असे पोलिसांना आदेश आहेत. यामध्ये बांगलादेशी व्यक्ती शोधणे, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करणे, त्यांचे साथीदार शोधणे, तसेच त्या सर्वांना परत पाठवणे आदी कामे येतात; मात्र या सर्वांत अधिक वेळ जात असल्याने या आदेशाला पोलिसांकडूनच केराची टोपली दाखवली जात आहे. एक सेक्युलर देश म्हणून युरोपमध्ये फ्रान्सचे उदाहरण दिले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्सने आपल्या सीमा शरणार्थींसाठी खुल्या केल्या होत्या. त्याचे विघातक परिणाम फ्रान्स आता भोगत आहे. फ्रान्समध्ये उसळलेल्या दंगली या त्याच्या या चुकीच्या निर्णयाचीच विषारी फळे आहेत. भारततही बांगलादेशी आणि रोहिंग्याची घुसखोरी प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. सरकारने आज याकडे गांभीर्याने पहिले नाही तर भविष्यात फ्रान्ससारखी स्थिती भारतावरही उद्भवू शकते. बांगलादेशी घुसखोरांना वेचून त्यांवर हकालपट्टीची कारवाई करण्यासंदर्भात केंद्र सरकारने ठोस धोरण आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करायला हवी. घुसखोरांना आश्रय देणाऱ्या, त्यांच्या रोजगाराची, निवासाची आणि सरकारी कागदपत्रांची सोय करणाऱ्या भारतीयांवर देशद्रोहाच्या गुन्ह्याअंतर्गत कारवाई करण्यात यावी, त्याशिवाय हे सर्व थांबणार नाही.

## नवोदय



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**संध्याकाळची वेळ होती. साधारणत: आठ वाजले होते. विराट च्या घरचे सगळे टी.व्ही.पाहत पाहत जेवण करत बसले होते. विराटच्या भावाला म्हणजे जय ला पुरणपोळ्या आवडतात म्हणून त्याच्या आईने आज आमरस व पोळ्या केल्या होत्या. विराट चे पप्पा नंतर जेवण करतो म्हणून सोप्यावर काहीतरी लिहीत बसले होते. हे सारे जेवण करत असताना पप्पांना फोन आला. तो फोन विराटच्या शाळेमधून विराटच्या माधव सरांचा होता. पप्पांनी तो फोन उचलला व म्हणाले, " हॅलो, हॅलो..!' " मी विराटच्या शाळेमधून माधव सर बोलतो." " हा नमस्कार सर, बोला, बोला सर" "अहो, सर, तुमचा मुलगा विराट हा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे."**

**(मागील अंकावरून)** "विराट चे पप्पा म्हणाले, एका रूममध्ये पंचेवीस जण राहत असतील तर विद्यार्थ्यांचा काय अभ्यास होणार? स्वच्छता कशी असणार ?सगळ्यात म्हणजे वरच्या व खालच्या जवळ जवळ पन्नास विद्यार्थ्यांमध्ये तीन-चार बाथरूम आणि तीन-चार संडास हे कसे पुरणार? असे अनेक प्रश्न निर्माण होत होते. एकंदरीत विराटच्या पप्पाला ते आवडले नव्हते. ते म्हणत होते की, मला या वस्तीगृहाचे वातावरण आवडलेले नाही." पण विराट ची फार इच्छा होती. पप्पा तसे म्हणाल्यामुळे तो मनातून दुःखी झाला होता. घरी येताना मात्र गाडीत तो कोणाशीच काही बोलत नव्हता. त्याचा चेहरा उदास झाला होता. हॉटेलमध्ये जेवण करतानाही तो काही बोलत नव्हता. त्याच्या आवडीची भाजी मागवली तरीही तो पोटभर जेवण करत नव्हता. मम्मी त्याला जेवणाचा आग्रह करीत होती. तरी तो दुर्लक्ष करत होता. तो कुणालाही बोलत नव्हता. झोपतानाही तो रडवेला चेहरा करूनच झोपला होता. त्याची नवोदय विद्यालयात शिक्षण घेण्यासाठी जाण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती होती. त्यांनीही त्या शाळेविषयी आणि शाळेच्या शिक्षणाविषयी खूप काही चांगले चांगलेच ऐकले होते. सकाळ झाली. सगळे झोपेतून उठत होते. मम्मीने विराटलाही उठवले. डोळे चोळीत चोळीत उठला. अचानकच तो रडायला लागला. सगळेजण त्याच्याभोवती गोळा झाले. मग पप्पांनी त्याला विचारले, "तुझी नवोदय विद्यालयात शिक्षण घेण्याची इच्छा आहे का? तुला जायचे आहे का?" तो पटकन म्हणाला," हो, माझे मित्रही तिथे जात आहेत मलाही तिथे शिक्षण घ्यायचे आहे.मग विराट चे पप्पा त्याला म्हणाले की, "तिथले वातावरण कसे आहे आणि कसे नाही. हे मी तुला सांगितले आहे. अनेक जणांना मी तुझ्यासमोर फोन लावूनही विचारले आहे. त्यांनीही तिथल्या वातावरणाविषयी, गैरसोयीविषयी, बेशिस्तीविषयी सांगितले आहे. तरी तुझी इच्छा असेल तर माझी काही हरकत नाही. तू जाऊ शकतोस. मला तुला अडवायचे नाही."हे ऐकल्याबरोबर विराट खूप खुश झाला. त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसू लागली. तो त्याच्या मम्मी पप्पाला म्हणाला,"हो मला जायचे आहे. मी तिथे खूप अभ्यास करीन. तुम्ही माझी काळजी करू नका. मी तिथे व्यवस्थित राहीन. मी काहीतरी बनून दाखवीन. विराटला तिथे पाठवण्याची आम्हा सगळ्यांची तयारी सुरू झाली. त्याच्यासाठी एक मोठी पेटी घेण्यात आली. त्याला पाणी पिण्यासाठी छोटा जार घेतला. कपडे, बकेट व छोट्या-मोठ्या वस्तूही घेतल्या. शेवटी विराटला नवोदय विद्यालयात पाठवण्याची सर्व तयारी झाली. विराटचा छोटा भाऊ जय मात्र उदास दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावर नाराजी दिसत होती. कारण घरात खेळायला, भांडण,मस्ती करायला कुणीच नसणार होतं. विराटला जय सारखा दादा दादा करत असे. आत्ता आपली ताटातूट होणार, दादा आपल्यापासून दूर जाणार याचं दुःखं जयला होत होतं. पण तो बोलून दाखवत नव्हता. हे त्याच्या चेहऱ्यावर सारं दिसत होतं. इकडे विराट चे पप्पा व मम्मी ही मनातून नाराज होत होते. पण ही नाराजी विराट समोर दाखवता येत नव्हती. व्यक्तही करता येत नव्हती. आनंदाने त्याला शाळेत सोडवायला पाहिजे असे त्यांना वाटत होते. कारण आपणच इथे नाराज झाल्याचे विराटच्या लक्षात आले तर तो तिथेही नाराज राहील म्हणून त्यांनी चेहऱ्यावर नाराजी येऊ दिली नाही. शेवटी विराटला नवोदय विद्यालयात पाठवण्याचा दिवस आला. रात्री मात्र मम्मी,पप्पाला झोप लागत नव्हती. त्याची मम्मी म्हणायची की, विराट तेथे कसा राहील? आंघोळ कशी करेल? एवढ्या लवकर सकाळी उठेल का? त्याला आंघोळीसाठी गरम पाणी असेल का? अशी चर्चा रात्री जागरणात केली. **क्रमशः**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# रमाईंचा आदर्श महिलांसाठी मोलाचा

## विद्याताई कांबळे यांचे प्रतिपादन : भोकरला रमाई जंयती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील काळात सावित्रीबाई व महात्मा फुले, शिवाजी महाराज, जिजाऊ आणि रमाई, बाबासाहेब आंबेडकर याच्यासह अनेक महापुरुषात सूसंवाद असायचा म्हणून समाज सुसंस्कृत बनला आहे. माता रमाईच चरित्र प्रत्येकानी वाचल पाहिजे यातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे घडले हे माहिती होईल. रमाईचा आदर्श महिलांसाठी लाखमोलाचा आहे, असे प्रतिपादन सौ.विद्याताई कांबळे यांनी बुधवारी ता. (सात) केले आहे.
शहरातील महात्मा फुले नगर वसाहतीत लूबींनी बूध्दविहार येथे माता रमाबाई आंबेडकर जयंती सोहळा घेण्यात आला त्यावेळी त्या होत्या. यावेळी भीमराव दूधारे,अप्पाराव येरेकार,एल.




पी.वारघडे, शहाणे, साहेबराव मोरे, सूधांशू कांबळे, बाबुराव पाटील,गौतम कसबे,पी. पी.हनवते, शिवाजी गायकवाड, जयभीम पाटील, यशोदाबाई महाबळे, कुसुमबाई सोनकांबळे, कांचन पाटील, सूरेखाबाई माळे याची उपस्थिती होती. सौ.कांबळे म्हणाल्या की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनात मातारमाई आल्या आणि तुम्हा आम्हाला सोनियांचे दिवस आलेत हे कुणी नाकारू शकत नाही. स्वताच्या कुटुंबीयांची पर्वानकरता न करता दिनदलीताच्या ऊध्दाराकरीता बाबासाहेबांना समर्थपणे साथ दिली आहे.सातकोटी लेकराची आई होऊन पोटची पोर गमवली अशी महान माता आता होणे नाही असे सांगितले आहे. रमाई जयंतीच्या निमित्ताने वकृत्व व डॉंस स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी स्पर्धक संघर्षना धम्मानंद जाधव,प्रणवी हिरे, मनस्वी माधव कांबळे, समृध्दी मिलींद वाघमारे यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. यापूर्वी बालगायक संकल्प जाधव व त्याच्या संचानी रमाईगीते सादर केली.भोजनदानानी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सूरत जाधव यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कपील कांबळे, मनोज शिंदे, दलीत डोंगरे, प्रितम डोंगरे, संतोष डोंगरे, राहुल जाधव, अविनाश गायकवाड, सुनील दूधारे, प्रकाश कागडे, अविनाश सरोदे, राहूल हनवते, अनिल कदम, प्रसेनजीत गाडेकर, वैभव कोकाटे, सुमेध सोनकांबळे, बाळा कदम, पृथ्वीराज वाघमारे यांनी परिश्रम घेतले आहेत.

# दीक्षाभूमीवर ५६ फूट उंच बुद्धमूर्ती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** तथागत गौतम बुद्ध यांची चलितमुद्रेतील ५६ फूट उंचीची मूर्ती नागपूरच्या दीक्षाभूमीवर आली असून लवकरच तेथे तिची स्थापना करण्यात येणार आहे. १.७ टन वजन असलेली अष्ठधातूची ही मूर्ती थायलंड येथून समुद्रमार्गे भारतात आली आहे. थायलंड आणि म्यानमार या दोन देशांतील दानदाते रिवाह खंजरनविस्थे व फादर ठेंगेयाल ठ्वेला यांनी बुद्धमूर्तीसाठी पुढाकार घेतला. थायलंड येथील चोनबुरी शहरात या मूर्तीची निर्मिती करण्यात आली. या मूर्तीची स्थापना करण्यासाठी थायलंड येथील दानदात्यांच्या उपस्थितीत मागील वर्षी दीक्षाभूमी परिसरात भूमिपूजन सोहळा पार पडला होता. आता या मूर्तीची स्थापना करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासच्या सहकार्याने मोठा चबुतरा तयार करण्यात येणार आहे. चबुतरा तयार झाल्यानंतर सुटे भाग जोडून संपूर्ण मूर्ती उभी करण्यात येईल. मूर्तीची स्थापना करण्यासाठी थायलंड येथून इंजिनिअर येणार असून, यासाठी त्यांनीच डिझाईन पाठवले आहे, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष तथा धम्मसेनानायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी प्रसारमाध्यमांना दिली.



# ईश्वरप्राप्तीसाठी अंतःकरणातील भक्तीमध्ये शुद्ध भाव असायला हवा

## ह.भ.प. समाधान महाराज शर्मा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** ईश्वर भक्ती करण्याचे अनेक मार्ग आहेत. ईश्वराला प्राप्त करण्यासाठी काही लोक भक्तीचे उघड प्रदर्शन करतात .परंतु वरवरची भक्ती काही कामाची नाही.
परमेश्वराशी समरस व्हायचे असेल तर अंतःकरणातील भक्तीमध्ये शुद्ध भाव असायला हवा असे प्रतिपादन ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी व्यक्त केले. श्रीक्षेत्र राजूर येथील अखंड हरिनाम सप्ताह निमित्त कीर्तन सेवेचे दुसरे पुष्प गुंफतांना बोलत होते.
'आम्हा हरीच्या दासा काही। भय नाही त्रैलोकी।।देव उभा मागे पुढे' या जगद्गुरू संत तुकोबारायांचा अभंग निवडून त्यावर निरूपण केले. पुढे बोलताना शर्मा महाराज म्हणाले की श्रीगणेश विघ्नांचा नाश करणारी देवता आहे.म्हणून आपण प्रत्येक शुभकार्याची सुरवात श्रीगणेशाने करतो. श्रीगणेशाची निष्ठेने भक्ती केल्यास जीवनातील विघ्नांचा वनाश झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून गणरायाची नियमित आराधना केली पाहिजे असा सल्ला त्यांनी भक्तांना दिला. नुकताच प्रभू श्रीराम यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात संपूर्ण देशात संपन्न झाला.पाचशे वर्षाच्या संघर्षानंतर आयोध्यानगरीत भव्य राम मंदिर निर्माण झाले याचा आम्हा सर्व राम भक्तांना अभिमान आहे. भारतीय संस्कृती अगदी पुरातन काळापासून चालत आलेली आहे. तिला कोणीही नष्ट करू शकत नाही असे शर्मा महाराज यांनी सांगितले. मानवी जीवनात आदर्श कृतीला फार महत्त्व आहे. चांगल्या विचारातून कृती घडल्यास आदर्श जीवन घडण्यास मदत होते.ईश्वर प्राप्तीसाठी भक्तांच्या अंतकरणांमध्ये शुद्ध भाव असला पाहिजे.असे समाधान महाराज शर्मा यांनी सांगितले. शेवटी सप्ताह संयोजन समितीच्या वतीने विष्णू महाराज सास्ते यांनी सर्वांचे आभार मानले.

# खुलताबाद महामार्गावर ठिकठिकाणी भेगा

## आमदारांच्या सूचनेला हरताळ, ठेकेदाराची मनमानी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** फुलंब्री -खुलताबाद महामार्गावर ठिकठिकाणी ( क्रॅक) भेगा पडण्याची सृंखला थांबता थांबत नसुण मात्र सुलतानपूर रानमळा ते देवळांना फाटा दरम्यान मोठ मोठी क्रॅक भेगा पडल्या असुण यासंदर्भात वार्षिक आमसभेत हा प्रश्न मांडला असताना व आमदार प्रशांत भाऊ बंब यांनी कर्मचाऱ्यांना सुचना करूण ही ठेकेदार सूचनेला हरताळ फसत असुण त्या क्रॅक भेगात अपघात सतत घडत असल्याचे चित्र आहे. फुलंब्री -खुलताबाद कोटी रुपये खर्च करून महामार्ग सिमेंटी रस्ता करण्यात आला.सिमेंटी रस्त्यांची पन्नास/शंभर वर्ष रस्ता टिकण्याच्या गप्पाही झाल्या.परंतु रस्ता करण्यात आला तेंव्हा पासून रस्ता काही करता सुरळीत राहत नाही.क्रॅक भेगा सातत्याने सुरु आहे तर त्याची दुरुस्ती पुर्तता ही ठेकेदार सतत करत आहे.पण काही करता रस्ता विना भेगा क्रॅक राहत नाही. यात ठिकठिकाणी खड्डे क्रक भेग पडून आहे. मात्र सुलतानपूर रानमळा ते देवळांना फाटा दरम्यान मोठ मोठी क्रॅक भेगा खड्डे आहे या संदर्भात पंचायत समिती ची वार्षिक आमसभेत या महामार्गा संदर्भात तक्रार केली तेव्ह आमदार प्रशांत भाऊ बंब यांनी उपाभियंता शाखाभियंता व कर्मचारी यांना तातडीने खड्डे भेगा भरुण रस्ता सुरळीत करण्याची सूचना केली.एकदिड महिना उलटला परंतू अद्याप त्याठिकाणी खडडे भेगा जैसे थे असुणही कर्मचाऱ्यांनी आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्या सुचना आदेश ला हरताळ फासली गेली आहे.व रोजच्या रोज या ठिकाणी अपघात होत असल्याचे चित्र आहे. यांकडे वरिष्ठांनी लक्ष घालून हा प्रकरण मार्गी लावावे असीमागजं वाहनधारक व नागरिकांनीही केली आहे.



# जळगावात निवडणूक आयोगाविरोधात शरद पवार समर्थक राष्ट्रवादीची निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** दिनांक 6 फेब्रुवारी 2024 रोजी भारतीय निवडनुक आयोगाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी फूटी संदर्भात पक्ष व चिन्हा बाबत निर्णय दिला. पक्ष व चिन्ह अजित पवार यांना देण्याचा निर्णय आयोगाने दिला. या निर्णयामुळे जनतेत तीव्र भावना उमटत असल्याचे दिसत आहे.1999 साली ज्या शरद पवारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची स्थापना केली त्यांच्या कडून पक्ष हिसकावून घेतल्या जात आहे. या घटनेचा निषेध तथा निवडणुक आयोगाने दिलेल्या असंवैधानिक निर्णयामुळे आयोगाच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते प्रसेनजीत पाटिल यांच्या नेतृत्वात निदर्शने जळगाव जामोद भीम नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर करन्यात आली. निवडणुक आयोग तथा सर्व संस्था केंद्र सरकारच्या ईशार्या वर काम करीत आहे. या संस्थाचा उपयोग विरोधी पक्षातील नेते फोडने त्यांच्यावर दबाव निर्माण करने या करीता केल्या जात आहे. आयोगाची स्वायत्ता संपुष्टात आणली गेली आहे त्याचा निषेध आज राष्ट्रवादी शरद पवार समर्थक यांच्या वतीने करण्यात आला. शरद पवार साहेब दिल्ली समोर कधी झुकले नाहित आणि झुकनार सुद्धा नाहीत. त्यांच्यासोबत पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता भाजपाच्या हुकुमशाही विरोधात त्वेषाने लढेल असे प्रतिपादन प्रसेनजीत पाटिल यांनी केले. निवडणुक आयोग व भाजपा विरोधात घोषणा देण्यात आल्या.यावेळी अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्ष एम.डी.साबीर, युवक जिल्हाध्यक्ष पराग अवचार, तालुकाध्यक्ष प्रमोद सपकाळ, कार्याध्यक्ष महादेव भालतड़क,शहराध्यक्ष ईरफान खान, सोशल मीडिया प्रदेश सचिव आशिष



वायझोडे, जिल्हा सरचिटनीस मोहसिन खान,एहजाज देशमुख,युवक विधानसभा अध्यक्ष दत्ता डिवरे,सिद्धार्थ हेलोड़े, अताउल्लाह पठान,राजू पाटिल अवचार, शेख ताहेर,विष्णु रोठे सरपंच,जितु चहेल, मोहम्मद जाकिर, अभिषेक कवळे,भूषण चौधरी, सै. आकिब, गणेश गाड़गे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाटबंधारे अधिकारी शेतकऱ्यांचे लाखो रुपये घेऊन करतात पार्टी

## अभियंता वट्टे यांनी कार्यालयाला टाळे लावून शेतकऱ्यांची केली फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता वट्टे यांनी अक्कलपाडा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडण्याबाबत शिष्टमंडळाला बैठकीसाठी बोलविले होते. त्यानुसार जि.प. सदस्य संग्राम पाटील हे शिष्टमंडळासह सकाळी सिंचन भवनात गेले असता वट्टे यांच्या दालनास टाळे आढळून आले. त्यामुळे वट्टे यांनी बैठकीला बोलावून मुंबईला जात आमची फसवणूक केली आहे. येत्या दोन दिवसांत शेतक-यांना पाणी मिळाले नाही तर सिंचन भवनावर सहाही गावातील गावकऱ्यांसह मोर्चा आणणारच, असा इशारा यावेळी संग्राम पाटील यांनी दिला. अक्कलपाडा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून धुळे तालुक्यातील चौगाव, उडाणे, गोताणे, कुंडाणे, आनंदखेडा, या गावातील शेतकऱ्यांना ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या उजव्या कालव्यात संपादीत झाल्या आहेत. त्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी व ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली होती. त्यांनी कार्यकारी अभियंता वट्टे यांच्याशी मी चर्चा करतो, तुम्ही देखील चर्चा करा, असे सांगितले होते. त्यानुसार पाठपुरावा करण्यात आला. आठ दिवसात पाणी सोडावे, अन्यथा शिंगाडे मोर्चाचा इशारा दिला होता. त्यानंतर वट्टे यांनी आम्ही



शेतकऱ्यांना पाणी द्यायला तयार असून आपण आपला मोर्चा स्थगित करून उद्या शिष्टमंडळासह बैठकीसाठी यावे, असे पत्र दिले होते. त्यामुळे मोर्चा स्थगित करून वट्टे यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही शेतकऱ्यासह आज सिंचन भवन येथे आलो असता वट्टे यांच्या कार्यालयाला कुलूप आढळून आले. त्यांनी आमची फसवणूक केली. त्यानंतर वट्टे यांच्याशी संपर्क साधला त्यांनी मी बाहेरगावी असून जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करतो, अशी दिशाभूल करणारी उत्तरे दिली. त्यामुळे जि.प. सदस्य संग्राम पाटील यांनी सिंचन भवन आवारात वट्टे यांचा जाहिर निषेध व्यक्त केला. तसेच त्यांच्या निलंबनाची मागणी करणार असल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले. येत्या दोन दिवसात शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी दिले नाही. तर सहाही गावातील ग्रामस्थांसह मोर्चा आणले. त्यानंतर होणाऱ्या परिणामास कार्यकारी अभियंता वट्टे हेच जबाबदार राहतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.




# देगाव येथे रिफ्रेशर्स कोर्स संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** महीला उत्कर्ष प्रतिष्ठाण इस्टीट्यूट ऑफ फार्म देगांव रिसोड जि.वाशिम, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल व महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड केमिस्ट अँड असोसिएशन व वाशिम जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने फार्मसी रिफ्रेशर्स कोर्स पार पडला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेश पाटील शिरसाट (अध्यक्ष वाशिम जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन व उपाध्यक्ष अमरावती झोन,प्रमुख पाहुणे म्हणून गणेश बंगळे सदस्य महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल संजय राठोड साहेब असिस्टंट कमिशनर एफडीए अकोला व प्रमुख मार्गदर्शक म्हणून भूषण माळी डी आय सी टेक्निकल ॲडव्हायझर, नंदकिशोर झंवर सचिव वाशिम जिल्हा केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन. त्याचबरोबर सोमनाथ अप्पा खके उपाध्यक्ष वाशिम जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, हरिभाऊ खोडके पाटील तालुका अध्यक्ष रिसोड, डॉ.सुनील शिरसागरप्राचार्य एम यु पी एस कॉलेज ऑफ फार्मसी देगाव,प्राध्यापक शिवाजी सावके, प्राध्यापक शरद चौधरी, प्राध्यापक धीरज सरनाईक,सचिव अनंत देशमुख, विजय झंवर,अमोल सरकटे रुपेश बाजड उदय जोगी,केलास सारडा हे उपस्थित होते या कार्यक्रमांमध्ये फार्मसी संदर्भात जागृतीकरण व फार्मसी क्षेत्रा मधील नवीन घडामोडी आणि नवीन औषधी संशोधन या गोष्टींचे मार्गदर्शन केले होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.भागवत सिरसाट यांनी केले तर आभार प्रदर्शन रुपेश बाजड व सांगता प्रा योगेश राजूरकर यांनी केली.

# किमान समान कार्यक्रमाशिवाय आघाडी अशक्य, ॲड. आंबेडकरांची स्पष्ट भूमिका

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेतून घालवयाचे आहे, केवळ एवढ्यासाठी आम्ही काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवेसनेच्या आघाडीत सहभागी व्हावे असे कोणाला वाटत असेल तर ते साफ चुकीचे आहे. किमान समान कार्यक्रम निश्चित झाल्याशिवाय आम्ही आघाडीत सामील होणे अशक्य आहे, अशी स्पष्ट भूमिका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मांडली.ते मंगळवारी नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते. आंबेडकर म्हणाले, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्याशी आघाडी करण्यासंदर्भात चर्चा सुरू आहे. परंतु, ही आघाडी अटी व शर्तीवर असणार आहे म्हणजेच किमान समान कार्यक्रमावर आधारित राहणार आहे. त्यासाठी वंचित बहुजन आघाडीने ३१ मुद्दे तयार केले असून त्यावर चर्चा व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. एवढेच नव्हे त्यातील काही प्रमुख मुद्दे किमान समान कार्यक्रमात असले पाहिजे, असा आमचा आग्रह आहे. असे झाल्यास आघाडी होईल आणि पुढील टप्प्यात जागावाटपाबाबत चर्चा होईल. अन्यथा आघाडी होणे अशक्य आहे. देशपातळीवर इंडिया आघाडी अस्तित्वात नाही. इंडिया आघाडीचा संयोजक कोण, असा प्रश्नही आंबेडकरांनी उपस्थित केला.भारताची अर्थव्यवस्था कापूस या पिकावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. यातून देशाला ३० टक्के विदेशी गंगाजळी मिळते. पण, त्याकडे सरकार फारसे लक्ष देत नाही. म्हणून आमची मागणी आहे, ज्याप्रकारे हिरे उद्योगांना केंद्र सरकार संरक्षण देते. त्याप्रमाणे कापसाला संरक्षण दिले पाहिजे.



# मच्छीमारांचे नाथसागर धरणात अंदोलन


आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथसागर जलाशयात बुधवारी हजारो मच्छीमारी जलसमाधी घेण्यासाठी जमा झाले होते. सदर और ऊर्जा प्रकल्प रद्द करण्याची मागणी करत कुटुंबासह पाण्यात बसुन तब्बल पाच तास अंदोलन केले. शासनाने जायकवाडी धरणावरील प्रस्तावित तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करावा या मागणीसाठी बुधवारी पहाटेच मच्छीमारांनी नाथसागर जलाशयात जलसमाधी आंदोलन सुरु केले. आंदोलनात मच्छीमार कुटुंबातील महिला, पुरुष, वृद्ध , लहान बालके, दिव्यांग हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सौरऊर्जा प्रकल्पाच्या विरोधात आंदोलकांच्या जोरदार घोषणाबाजीने नाथसागर जलाशय दणाणून गेले होते. हजारो आंदोलकांच्या संख्येने जलाशयात जनसागर लोटला होता. आंदोलकांनी दिवस भर पाच वाजेपर्यंत पाण्यात ठिय्या देऊन आंदोलन केले. या आंदोलनामुळे प्रशासनाची मोठी दमछाक झाली. तहसीलदार व जायकवाडीचे कार्यकारी अभियंता यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दहा दिवसांत बैठक घेऊन प्रकल्प रद्द करण्याचा प्रस्ताव मांडण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन १५ दिवसांसाठी स्थगित करण्यात आले. अशी माहिती जायकवाडी मच्छीमार बचाव संघर्ष समितीतर्फे अध्यक्ष बजरंग लींबोरे,भगवान घटे,रघुनाथ ईच्छया,अशोक बर्डे,मोतीलाल घुंगासे,अँड रमेश गव्हाणे,यांनी जाहीर करण्यात आली. यावेळी जलाशय परिसरात आर.सी.पी. च्या दोन तुकड्यांसह कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. केंद्र सरकारकडून जायकवाडी धरणात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव असून या प्रकल्पाला धरणातील मच्छीमार करुन उपजिविका भागविणाऱ्या मच्छीमार प्रचंड विरोध करीत आहे. धरणावर प्रकल्प उभारल्यास धरणावर अवलंबून असलेल्या कहार, भोई, भिल्ल समाजाच्या हजारो मच्छीमार कुटुंबावर उपासमारीची वेळ येणार आहे. यापुर्वीही मच्छीमारांनी तहसील कार्यालय, आमरण उपोषण आदी आंदोलन करुन विरोध दर्शविला आहे. मात्र शासन प्रकल्प रद्द करण्याचा ठोस निर्णय घेत नसल्याने मच्छिमारांनी जलसमाधी आंदोलनाचे हत्यार उपसले. जलाशयातील पाण्यात उतरुन आंदोलकांनी सौरऊर्जा प्रकल्प रद्द झालाच पाहिजे, पक्षी अभयारण्याचे रक्षण झालेच पाहिजे, जायकवाडी धरणाचे प्रदुषण थांबले पाहिजे अशा घोषणांनी जलाशय परिसर दणाणून सोडला.

# नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा : वाघेरे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** जनसेवेसाठी सदैव तत्पर



असणारे एक कार्यक्षम नगरसेवक म्हणून नगरसेवक संदीपभाऊ बाळकृष्ण वाघेरे यांची पिंपरी चिंचवड परिसरात एक वेगळी ओळख आहे.जनतेची सेवा करण्यासाठी त्यांच्या कडून जनहिताचे विविध उपक्रम हाती घेतले जात असतात. गेल्याच शनिवारी म्हणजे ३ फेब्रुवारी रोजी कै. सुमनताई बाळकृष्ण वाघेरे यांच्या स्मरणारर्थ एक आरोग्य विषयक उपक्रम घेण्यात आला शहरातील नागरिकांच्या दृष्टीने आरोग्य शिबीर व नेत्र तपासणी शिबिर घेतले होते.यावेळी अनेकांनी या शिबिराचा लाभ घेतला.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक संदीपभाऊ बाळकृष्ण वाघेरे यांच्या आयोजनातून पुन्हा एकदा त्यांच्या हातून आरोग्य सेवेचे पवित्र कार्य घडत आहे.शनिवार दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेमध्ये मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा असून आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याने लोकांचा आरोग्याची विशेष काळजी घेण्यासाठी नगरसेवक संदीप वाघेरे हे धडपड करत असल्याने लोकांकडून ही या कार्याबद्दल कौतुक होत आहे. सर्व नागरिकांनी या आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा. असे आवाहन या शिबिराच्या निमित्त नगरसेवक संदीपभाऊ बाळकृष्ण वाघेरे यांनी केलेले आहे.हे शिबीर श्री संदीपभाऊ बाळकृष्ण वाघेरे जनसंपर्क कार्यालय, तपोवन मंदिर रोड,पिंपरीगाव पुणे येथे घेण्यात येणार आहे. शिबिरासाठी लोकमान्य हॉस्पिटल, चिंचवड / डॉ.चाकणे आय हॉस्पिटल पिंपळे सौदागर यांचे सहकार्य असणार आहे. अधिक माहितीसाठी अमित कुदळे ९६७३४९४१४९ आणि सचिन वाघेरे ९१४५४९४१४९ यांच्याशी संपर्क करावा.

# गेम चेंजर्स संघाने अग्रसेन क्रिकेट लीग 2024 जिंकली

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अग्रवाल युवा मंच आयोजित अग्रसेन क्रिकेट लीग सीझन-5 4 ते 6 फेब्रुवारी दरम्यान एमजीएम स्टेडियमवर आयोजित करण्यात आला होता ज्याचे मुख्य प्रायोजक वंश-प्रीत ग्रुप होते.

अग्रवाल सभेच्या अंतर्गत, अग्रवाल युवा मंचने सादर केलेल्या ACL 2024 चे उद्घाटन श्री गृह निर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री अतुलजी सावे यांच्या हस्ते झाले. त्यांच्यासोबत अग्रवाल सभेचे अध्यक्ष - श्री कुंजबिहारी अग्रवाल, सचिव - श्री मनीष अग्रवाल, अग्रवाल युवा मंचचे अध्यक्ष - श्री कुणाल अग्रवाल, सचिव - श्री आशिष भारुका, क्रेडाईचे अध्यक्ष श्री विकास चौधरी आणि नगराध्यक्ष श्री. शिवाजी दधंगे हेही उपस्थित होते. अग्रसेन क्रिकेट लीग 2024 च्या या 5 व्या हंगामाचा अंतिम सामना गेम चेंजर्स विरुद्ध मॅड हॉक्स यांच्यात झाला, या सामन्यात गेम चेंजर्सने मॅड हॉक्सचा 8 गडी राखून पराभव करून विजय मिळवला, कॅप्टन. समरप्रीत अग्रवालने 29 धावा केल्या आणि 2 बळी घेतले. मयूर अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली मॅड हॉक्स. यश अग्रवालने 47 धावा करत कडवी झुंज दिली. अग्रसेन क्रिकेट लीग २०२४ च्या समारोप समारंभात अग्रवाल युवा मंचचे सर्व माजी अध्यक्ष श्री जगदीश अग्रवाल, प्रमोद अग्रवाल, आशिष अग्रवाल, श्री नवनीत भरतिया, दीपक अग्रवाल, श्री अनूप अग्रवाल, तसेच अग्रवाल सभेचे सचिव मनीष अग्रवाल, उपाध्यक्ष श्री किरण भारुका, सहसचिव श्री प्रदीप बगाडिया, कोषाध्यक्ष श्री दीपक




बगाडिया. आणि अग्रवाल युवा. फोरमचे अध्यक्ष श्री. कुणाल अग्रवाल, सचिव आशिष भारुका, उपाध्यक्ष रवी गुप्ता, सहसचिव मधुर अग्रवाल आणि प्रसाद अग्रवाल, खजिनदार CA अमित बगाडिया, मुख्य प्रायोजक विनोद अग्रवाल. वंश-प्रीत ग्रुप कडून, प्रितेश धानुका, बहू बेटी मंडळाच्या अध्यक्षा सुश्री शितलजी अग्रवाल आणि इतर प्रायोजक एसीएल 2024 चे समर्थन करणारे आशिष अग्रवाल (डी फोर्स), श्री गणेश जिंदाल, श्री पवन जिंदाल, संदीप टिबडेवाला, समीर टिबडेवाला, श्री पुष्कर दरगड, मधुर अग्रवाल, अनिकेत अग्रवाल, आशिष अग्रवाल, अंकित अग्रवाल, कुणाल बन्सल. श्लोक बगाडिया, केतन धन्नावत, प्रथमेश भारुका, योगेश मोर, आशिष मोर हे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. या स्पर्धेत अल्केश अग्रवालनेही ३० चेंडूत शतक झळकावले, हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य होते. स्पर्धेचे निकष : फलंदाज - साजन अग्रवाल, गोलरक्षक – समरप्रीत अग्रवाल, क्षेत्ररक्षक - श्लोक बगाडिया, मलिकावीर - श्याम अग्रवाल.

# पुन्हा एक तुरीची गंजी आगीच्या विळख्यात

## अज्ञात विघ्नसंतोषीचे कृत्य : मोरगव्हाण येथील घटनेत लाखो रुपयांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील खडसे**

**रिसोड :** तालुक्यात काही अज्ञात विघ्नसंतोषी व्यक्ती आकस बुद्धीतून शेतमालाच्या उभ्या गंज्यांना आग लावून त्याची राखरांगोळी करण्याचे सत्र सुरू केले आहे. सवड येथील 'तुरीच्या गंजीला आग' या बातमीची शाई वाळते न वाळते तोच पुन्हा मोरगव्हाण येथील एका शेतकऱ्याची तुरीची गंजी आगीच्या विळख्यात सापडून खाक झाली आहे. या घटनेत सदर शेतकऱ्याचे दोन लाख रुपयाचे नुकसान झाले असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. वारंवार घडणाऱ्या या गंभीर घटनांकडे पोलीस प्रशासनाने गांभिर्यपूर्वक लक्ष घालून सबंधित अज्ञात विघ्नसंतोषी गुन्हेगारांचा शोध घ्यावा अशी मागणी जोर धरत आहे. तालुक्यातील मोरगव्हाण शेतशिवारात चाकोली येथील शेतकरी कोंडुजी मोरे यांची शेती आहे. सदर शेतजमीन मोरगव्हाण येथील शेतकरी कैलास दत्ता कोकाटे यांनी बटईच्या स्वरूपात भागीदारीने केली आहे. प्रपंचाचा गाडा हाकण्यासाठी दोन पैसे मिळावे यासाठी त्यांनी सदर भागिदारीच्या शेतात मोठ्या कष्टाने घाम गाळून पीक पिकवले आहे. बारा महिन्यातून एकदा हातात येणाऱ्या तुरीच्या पिकाची नुकतीच त्यांनी कापणी करून गंजी लावली होती. मात्र काल दि.७ रोजी रात्री उशिरा कोण्यातरी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या उभ्या गंजीला आग लावून दिली आहे. सदर आगीच्या विळख्यात गंजी जळून खाक झाली आहे. या घटनेत सबंधित शेतकऱ्याचे अंदाजे दोन लाख रुपयाचे नुकसान झाले असल्याची माहिती पुढे आली आहे. या घटनेचा तलाठी यांनी पंचनामा केला असून, पोलीसात तक्रार दाखल केली असल्याचेही सांगण्यात येत आहे. याआधी अज्ञातांनी सोयाबीन गंज्या पेटवून दिल्याचे अनेक उदाहरणे सर्वश्रुत आहेत. त्यानंतर आता तुरीच्या गंज्या पेटवून देण्याचे सत्र सुरू झाले आहे. हेच सदर घटनेवरून अधोरेखित होत आहे. अवघ्या दोन दिवसाच्या अंतराने तालुक्यातील मोरगव्हाण येथील ही दुसरी घटना घडली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात भितीचे वातावरण पसरले आहे.



**अज्ञात गुन्हेगाराचे पोलिसांना आव्हान :** एरव्ही, पाच पन्नास हजारांची चोरी झाली तर पोलीस प्रशासनाकडून श्वान पथकास पाचारण करून कसून चौकशी करण्यात येते . मात्र काबाड कष्ट करून शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल कोणीतरी अज्ञात विघ्नसंतोषी त्या शेतमालाची राखरांगोळी करुन अघोरी आनंद लुटतो . यात सबंधित शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते . त्याचे संपुर्ण वर्षभराचे आर्थिक बजेट कोलमडून शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येते . ही बाब मात्र कोणीच गांभीर्याने घेत नाही अशी खंत शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे . दिवसागणिक शेतमालाच्या गंज्या पेटवून देण्याचे सत्र वाढतच चालल्यामुळे, एक प्रकारे सबंधित अज्ञात गुन्हेगार पोलीस प्रशासनासच आव्हान देत असल्याचे सर्वसामान्य नागरिक बोलत आहेत .



# पोलीस पाटलांची रिक्तपदे त्वरित भरा

## उबाठाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील पोलीस पाटलांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत ती त्वरित भरण्यात यावी याकरिता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तहसीलदार रिसोड यांना निवेदन देण्यात आले.

तालुक्यात बहुतांश गावातील पोलीस पाटील सेवानिवृत्त झाल्यामुळे व इतर कारणामुळे पदे रिक्त आहेत सदर पदाचा पदभार इतर गावांमध्ये हस्तांतरित केलेला आहे त्यामुळे नागरिकांचे शालेय विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असून वेळ वाया जात आहे. या बाबीची दखल घेऊन रिसोड तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख डॉक्टर सुधीर कव्हर रिसोड विधानसभेचे सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप उपजिल्हाप्रमुख डॉक्टर चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनात तहसीलदार मार्फत शासनास निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैभव सरनाईक शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख नारायण आरु रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी उपतालुकाप्रमुख गजानन खोडके उपतालुकाप्रमुख समाधान काठोळे वाकत सर्कल प्रमुख शिवाजी सोनवणे दीपक मापारी यांच्यासह शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासीबहुल जिल्ह्यातील १०६ महाविद्यालयांत पोहोचली 'शिक्षणयात्रा'

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हा परिषद शाळा लखमापूर ते एस.ओ.ए.एस. युनिव्हर्सिटी ऑफ लंडन असा प्रवास करणारा २६ वर्षीय तरुण ॲड.दीपक हेमलता यादवराव चटप. ब्रिटिश सरकारमार्फत देण्यात येणारी जागतिक प्रतिष्ठेची शेवनिंग शिष्यवृत्ती दीपकला मिळाली. नुकतेच लंडन येथून कायद्याचे शिक्षण पूर्ण करून तो भारतात परतला. भारतात परतल्यानंतर पगाराच्या नोकरीच्या मोहात तो पडला नाही. ग्रामीण भागात माहितीचा अभाव, पुरेसे मार्गदर्शन न मिळणे, आर्थिक अडचणी आदींमुळे शिक्षणाबाबतची निरुत्साहता विद्यार्थ्यांत वाढताना दिसते. शिक्षण संधीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी 'शिक्षण यात्रा : एज्युकेशन टू एम्पॉवरमेंट' हा कृतीयुक्त कार्यक्रम दीपकने हाती घेतला. २६ नोव्हेंबर २०२३ संविधान दिन ते २६ जानेवारी २०२४ गणतंत्र दिन या दोन महिन्याच्या काळात चंद्रपूर-गडचिरोली-यवतमाळसह विदर्भातील १२ वी पुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात पोहोचून देश-विदेशात पदव्युत्तर शिक्षणातील संधी, शिष्यवृत्ती, फेलोशीप बाबतची माहिती आणि आव्हाने याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते अविनाश पोईनकर यांनी शिक्षणयात्रेचे समन्वयक म्हणून भूमिका पार पाडली. चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण १५ तालुके, गडचिरोली जिल्ह्यातील ५ तालुके व यवतमाळ जिल्ह्यातील ५ तालुके असे एकूण २५ तालुक्यांत शिक्षण यात्रा पोहोचली. शिक्षण यात्रा कार्यक्रमाच्या माध्यमातून ॲड.दीपक चटप यांनी १०६ महाविद्यालयातील जवळपास २७,००० हुन अधिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संधी, शैक्षणिक कौशल्य आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनात शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे यांनी देखील विशेष सहकार्य शिक्षण यात्रेला केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देशातील नामांकित टाटा इंस्टीट्युड ऑफ सोशल सायन्सेस (TISS), अझीम प्रेमजी विद्यापीठ (APU), जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली (JNU), दिल्ली विद्यापीठ (DU), IIPS, अशोका विद्यापीठ, IIMB, IIT, IIM, शिव नादर विद्यापीठ, इंडियन स्कूल ऑफ डेवलपमेंट मनेजमेंट (ISDM) आदी विद्यापीठे व गांधी फेलोशिप, युथ फॉर इंडिया फेलोशिप, टीच फॉर इंडिया फेलोशिप आदी फेलोशिपसह विविध संधी व त्याची तयारी बाबत थेट मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध झाले. आदिवासीबहुल व मागास समजला जाणाऱ्या चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात शिक्षण यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देश-विदेशातील नामांकित विद्यापिठे, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती तसेच फेलोशीप याबाबत पुरेसी माहीती व्हावी. देश-विदेशातील नामांकित विद्यापीठात उच्चशिक्षणासाठी पुरेसे मार्गदर्शन मिळावे, नेतृत्व कौशल्य विकसित व्हावे या हेतूने चंद्रपूर जिल्ह्यातून विदर्भात उच्चशिक्षणाचा जागर करणारी शिक्षणयात्रा सुरु केली. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर, जागृत संस्था व विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ब्रिटीश सरकारची जागतिक प्रतिष्ठेची चेव्हनिंग शिष्यवृत्ती प्राप्त तरुण वकिल, नुकतेच ब्रिटीश सरकारने चेव्हनिंग गोल्ड पुरस्काराने सन्मानित केलेले ॲड.दीपक चटप यांच्या पुढाकारात ही शिक्षण यात्रा काढण्यात आली होती. शिक्षण यात्रेला डॉ.पंकज नरूले, श्रीकांत एकोडे, निलेश नन्नावरे, संदीप गोहोकार, पवन मोटघरे, वैभव अडवे, प्रतीक पानघाटे आदींचे सहकार्य लाभले.




# घरगुती कामगारांच्या नोंदणी शुल्कात कपात

## प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या पाठपुराव्याला यश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पार्टी प्रदेश



कामगार मोर्चाने केलेली मागणी मान्य करत राज्य सरकारने घरेलू कामगार नोंदणी शुल्कात कपात करण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे. हा निर्णय घेतल्याबद्दल भाजपा कामगार मोर्चाने राज्य सरकारचे व या मागणीचा सरकार दरबारी पाठपुरावा करणाऱ्या भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत. घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी राबवण्यात येणा-या योजनांच्या लाभार्थ्यांच्या नोंदणी शुल्कात व अंशदान रकमेत घसघशीत कपात करण्याचा निर्णय शासनाने 5 फेब्रुवारी रोजी घेतला आहे. कामगार मोर्चाच्या मागण्यांबाबत काही महिन्यांपूर्वी भारतीय जनता पार्टी प्रदेश मुख्यालयात श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली कामगार मंत्री सुरेश खाडे, भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, विक्रांत पाटील, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. या बैठकीत कामगार मोर्चाच्या वतीने घरेलू कामगार नोंदणी शुल्कात कपात करावी अशी मागणी करण्यात आली होती. घरेलू कामगारांचे नोंदणी शुल्क, अंशदान रकमेत कपात करणे तसेच दारिद्र रेषेखालील ज्येष्ठ नागरिकांना वयपरत्वे येणा-या शारिरीक अक्षमतेनुसार त्यांना सहाय्यभूत उपकरणांची असलेली गरज लक्षात घेऊन 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबवण्यात यावी  अशा मागण्या कामगार मोर्चातर्फे करण्यात आल्या होत्या.

भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री. बावनकुळे यांनी कामगार मोर्चाच्या या मागण्यांचा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश येऊन राज्य सरकारने याबाबतचा शासन निर्णय जारी केला.  या निर्णयांचा लाभ हजारो ज्येष्ठ नागरिक व घरेलू कामगारांना होणार आहे असे कामगार मोर्चातर्फे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली काही महिन्यांपूर्वी झालेल्या बैठकीला कामगार मोर्चा प्रदेश प्रभारी गणेश ताठे, सरचिटणीस प्रमोद जाधव, केशवराव घोळवे, मंगला भंडारी, रेखा बहनवाल, अजय दुबे, हनुमंत लांडगे, अमित कदम आदी पदाधिकारी उपस्थित होते. या दोन शासन निर्णयाद्वारे घरेलू कामगारांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी म्हणून नोंदणी करण्यासाठीच्या मासिक शुल्कात रुपये 30 वरून रुपये 1 इतकी घसघशीत कपात करण्यात आली. नोंदणीकृत लाभार्थ्यांच्या अंशदान रकमेत मासिक रुपये 5 वरून रुपये 1 इतकी कपात करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांना वयपरत्वे येणा-या असमर्थता व अक्षमतेनुसार सहाय्यभूत उपकरणे पुरवण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबवण्यात येणार आहे. लाभार्थ्यांच्या बँकेत डीबीटी द्वारे एकवेळ एकरकमी रुपये 3000 जमा केले जाणार आहेत.

# मित्रास दिलेल्या पिकअपची घरासमोरून चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** मित्रास वापरण्यास दिलेल्या पिकअपची रात्रीच्या वेळेस राहत्या घरासमोरून चोरी झाल्याची घटना विंचुर येथे घडली आहे. सदर घटनेमुळे वाहनधारकांची चिंता वाढली आहे. याबाबत पिकअप मालक अशोक कारभारी अडसरे (वय ४४) यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत, माझी बोलेरो पिकअप गाड़ी नं.एम.एच.१७ ए.जी ३२१० ही सफेद रंगांची पिकअप माझा मित्र रमेश परशराम जाधव रा.विंचुर यास सुमारे एक वर्षापासुन वापरण्यास दिलेली आहे. तो पाटोदा, साबरवाडी, सावरगाव, खैरगव्हाण इत्यादी ठिकाणाहून रोज सकाळी व संध्याकाळी दुध संकलन केंद्रातून दूध संकलित करून लासलगाव येथे दूध संकलन केंद्रात दूध पुरवून रात्री घरासमोर लावतो. मात्र दि.६ रोजी सकाळी ७ वाजता अंगणात पिकअप आढळून आली नाही. आजुबाजुला, परिसरात विचारपुस केली असता तसेच विंचुर गावात शोध घेतला परंतु माझी गाडी कुठेही दिसली नाही, त्यामुळे गाडी चोरीस गेल्याची खात्री झाल्याने मी लेखी फिर्याद देत आहे असे म्हटले आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गु.र.नं.३८/२०२४ भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून स.पो.नि.भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.कैलास बिडगर अधिक तपास करीत आहेत.

# आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** येथील आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय, शेवगाव या ठिकाणी आज इयत्ता बारावी कला ,विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उद्योजक, वक्ता तथा लेखक एन. बी. धुमाळ, प्रमुख अतिथी म्हणून जि . प.सदस्या सौ . हर्षदाताई काकडे, संस्थेचे सीईओ प्रा. लक्ष्मणराव बिटाळ, प्राचार्य संपतराव दसपुते, शिक्षण विभाग प्रमुख प्रा.वंदना पुजारी,प्रा. अशोक आहेर, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक शिवाजी पोटभरे, खोसे सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी सौ. हर्षदाताई काकडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. इयत्ता बारावी नंतर तुम्हाला शिक्षणाची असंख्य दालने खुली असतील अशा वेळेस आपल्या आवडीनुसार क्षेत्र निवडून त्यामध्ये यश संपादन




करावे व आई-वडिलांचे ,शाळेचे ,संस्थेचे नाव उज्वल करावे असा त्यांनी विद्यार्थ्यांना उपदेश केला .भविष्यात तुम्हाला कुठल्याही प्रकारच्या अडचणी आल्या तर आमच्याशी संपर्क साधा. आम्ही तुमच्या अडचणी नक्कीच सोडवू असे आश्वासित केले. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. लक्ष्मण बिटाळ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, की आजचा कार्यक्रम हा निरोप समारंभ नसून तुमच्या भावी जीवनासाठीचा शुभेच्छा समारंभ आहे .आयुष्यात संस्कार हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे, संस्कारित व्यक्ती कधीही अयशस्वी होत नाही.विद्यार्थ्यांनी आई - वडील, शिक्षक, समाजाप्रती कृतज्ञता भाव ठेवावा व भविष्यात विचारपूर्वक आपले करिअर निवडावे. प्राचार्य संपतराव दसपुते विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देताना म्हणाले, की सर्वांनी कॉपीमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे तुम्ही घेतलेल्या कष्टाचे फळ नक्कीच तुम्हाला मिळेल. यावेळी इयत्ता बारावीचे विद्यार्थी चि. सुनील चव्हाण, अनिकेत गिऱ्हे ,कु. ज्ञानेश्वरी नरोटे, वैष्णवी वाघमारे यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यालयाप्रति व प्राध्यापकां प्रति कृतज्ञता भाव व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष एन. बी. धुमाळ आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, की विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचा आदर्श घेऊन त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे. आपले ध्येय अंतर्मनाशी कोरून यश मिळेपर्यंत प्रयत्न करत राहावे. विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहून जीवणात शॉर्टकटचा मार्ग न स्वीकारता आपल्यातील क्षमता ओळखून आवडीनुसार क्षेत्र निवडून त्यात उत्तुंग भरारी घ्यावी असा त्यांनी यशाचा मूलमंत्र दिला. त्यांनी कनिष्ठ महाविद्यालयास १११ पुस्तके भेट दिली. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जरीना शेख यांनी तर कार्यक्रमाचा समारोप पर्यवेक्षक शिवाजी पोटभरे यांनी केला.

# संविधान चळवळ ही सर्वांनी राबवली पाहिजे : प्रतिभा शेलार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली पाच वर्षापासून महालक्ष्मी आधार फौंडेशन या संस्थेच्या माध्यमातून उपक्रम हाती घेतले जात आहेत. संविधानाचे कार्य सुद्धा सुरू आहे. कायदा कलम याबाबत अभ्यास केलेला आहे. संविधानाची उद्देशिका प्रत सातशेहून अधिक लोकांपर्यंत पोहचविलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊनच काम करत असते.समाजात ज्या काही विकृत घटना घडतात किंवा त्या संविधानिक नसतात. अशा सर्व विषयांवर मी आवाज उठविते.ह्या विषयांना मार्गी सुद्धा लावते. समाज हित जपण्यासाठी संविधान कार्य खूप महत्वाचे आहे.



जातीय चळवळ तर मी मानतच नाही.मी संविधान मानते.संविधान चळवळ ही सर्वांनी राबविली पाहिजे.असे प्रतिपादन महालक्ष्मी आधार फौंडेशनच्या संस्थापिका प्रतिभा शेलार यांनी केले. त्या सातारा येथील त्यांच्या कार्यालयातून मुलाखत प्रसंगी संवाद साधत असताना बोलत होत्या.सुशिल गायकवाड यांनी त्यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिल्यानंतर प्रतिभा शेलार यांची मुलाखत घेतली.
यादरम्यान सुशिल गायकवाड यांनी प्रतिभा शेलार यांना त्यांच्या कार्यासोबतच विविध विषयांवर आधारित प्रश्न विचारले.प्रतिभा शेलार यांनी अगदी मन मोकळे पणाने संवाद साधत कार्याबद्दल माहिती दिली.मुलाखती पूर्वी प्रतिभा शेलार यांनी भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत तसेच पेन देऊन सुशिल गायकवाड यांचे स्वागत केले.यावेळी मारुती सोनवणे उपस्थित होते.तसेच सुशिल गायकवाड यांनी प्रतिभा शेलार यांना अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र पुस्तिका भेट दिली.संविधान कार्यासोबतचे महिलांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम स्वतः प्रतिभा शेलार करत आहेत.शिवाय जे पिडीत पुरुष असतील अशांच्या बाजूने सुद्धा खंबीरपणे उभ्या राहत आहेत. जसा महिला आयोग हा महिलांच्या बाजूने आहे.तसेच पुरुष आयोग सुद्धा पुरुषांच्या बाजूने असावा.नुकतीच काही दिवसांपूर्वी पुरुष आयोगाची स्थापना करण्यात यावी.म्हणून त्यांनी सरकारकडे मागणी केलेली आहे.
एक महिला म्हणून मी समाज हिताच्या कार्यात पुढे आहे.सर्व महिलांनी सुद्धा पुढे यायला पाहिजे. समाजाच्या हिताबद्दल कार्य करायला हवे. अशी अपेक्षा सुद्धा प्रतिभा शेलार यांनी व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली लोकशाही याबद्दल आपणास काय वाटते असे प्रतिभा शेलार यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांना देव समजलं जायचं. त्यांच्या तत्वांवर,कार्यावर लोकं कार्यरत होती. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या पध्दतीने हे संविधान लिहिलेले आहे. तीच तत्वे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात पाहायला मिळतात.या भारत देशात आपला जन्म झाला हे आपलं भाग्य आहे.या देशात मला ही एक चांगलं कार्य करता येत आहे. याचा अभिमान वाटत आहे.
मी संविधान उद्देशिका देण्याचे काम तर करतच आहे. परंतु समाजातील प्रत्येक व्यक्ती संविधानाचे कार्य कसे करेल,संविधान वाचन लोकं कसे करतील यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे, असा सुद्धा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिलांना स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने सुद्धा संस्थेच्या माध्यमातून ब्यूटीपार्लर असेल, टेलरिंगचे क्लासेस असेल किंवा विविध स्वरूपाची व्यवसायिक प्रशिक्षण असतील ती मोफत देण्याचा प्रयत्न केलेला आहे.यावर सुद्धा त्यांनी संवाद साधला. तरुण मुला मुलींनी सोशल मीडियाचा वापर करत असताना काळजी घ्यायला हवी. महिलांनी सभ्यता दाखविली पाहिजे.आपल्या गैर वर्तनाने पुरुषां मधील विकृती निर्माण होणार नाही. याची काळजी सुद्धा महिला वर्गांनी घेतली पाहिजे, अशी अपेक्षा सुद्धा प्रतिभा शेलार यांनी व्यक्त केली. गौतमी पाटीलच्या कार्यक्रमातून अश्लीलता निर्माण होत असल्याने तिच्या कार्यक्रमावर बंदी घालण्यात यावी.म्हणून सुद्धा प्रतिभा शेलार यांनी आक्रमक भूमिका घेतली.या विषयावर सुद्धा त्यांनी परखडपणे संवाद साधला.समाजात चुकीच्या गोष्टी घडत असतील तर यावर आपण बोलले पाहिजे, असे सुद्धा प्रतिभा शेलार यांनी म्हटले. प्रतिभा शेलार यांच्या कार्याची दखल म्हणून त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. पुरस्कारावर व्यक्त होताना त्या म्हणाल्या की,मला पुरस्कार नको तर बदल हवा आहे. अशी भावना अगदी तळमळीने व्यक्त केली.

# सोयगाव तालुक्यात निकृष्ट कामाचा धडाका; शाखाभियंत्यांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्रीचक्रधर स्वामीचे भव्य मंदिर असून येथे दररोज हजारो भाविक भक्त दर्शनासाठी जाळीचादेव ते सावळदबारा ८५१ पायऱ्या उतरुन पायी चालत येतात आता येणाऱ्या दांडीपोर्णिमा मोठी यात्रा दि.२४ फेब्रुवारीला २०२४ ला भरणार आहे या यात्रेला राज्य, परराज्यातून भाविक भक्त सावळदबारा येथे चक्रधर स्वामीच्या दर्शनासाठी येतात. परंतु तालुक्यात ठिकठिकाणी विविध विभाग तथा विविध पक्षाच्या खासदार - आमदार यांच्या निधीतून विविध कामे सुरु आहे मात्र कामाचा दर्जा निकृष्ट दर्जाहिन असुण याकडे हेतुतः विभागांचे शाखाभियंता व उपाभियंता दुर्लक्ष करत असल्याने "भर अब्दुला गुड थैली मे" थातुरमातुर कामे करुन गडगंज कामाई करण्याचें सपाटा प्रकार घडत असल्याचे चित्र सावळदबारा ते जाळीचा देव पांदन रस्ताचे काम चालू आहे अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम ठेकेदार करत आहे रस्तावर कोणत्याही प्रकारचा अंदाज पत्रक नाही. ठेकेदार फोन उचलत नाही उचलला तर अरेरावीची भाषा वापरतो असुण ठिकठिकाणी गांवकरी व काम करणारी यंत्रणात तु तु मैं मैं वाद होत असल्याचे चित्र दिसून येत असल्याचे मो.रफीक मो.शब्बीर यांनी बोलताना सांगितले आहे. तालुकास्तरी समिती नेमुन झालेल्या व होत असलेल्या कामांची पाहणी व चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. सावळदबारा सद्या विकास कामांना वेग आला असून सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, जल जीवन मिशन, तथा खासदार आमदार यांच्या निधीतून रस्ते, पुले, इमारती, सिमेंट रस्ते, रस्ते खडीकरण, पेव्हर ब्लॉक, सुशोभीकरण आदि मोठ्या प्रमाणावर कामे सुरु आहे. मात्र कामे ठिकठिकाणी निकृष्ट दर्जाचे दर्जाहीन थातुरमातुर होत असल्याचे तक्रारी नागरिक करत आहे. जाळीचा देव पांदन रस्ता खडीकरण करताना खोदाई न करता, वरच्या वर खडी, दबाई न करता मुरुम टाकणे, पाणी न टाकणे, साहित्य कमी वापरने काम करताना कामापुर्वी कामाचे फलक न लावणे जे ना करुन कामाची माहिती सार्वजनिक होऊ नये. बांधकामावर वाळु व दगडी चुरा ऐवजी पुर्ण दगडी चुरा वापरणे, बांधकामांवर पाणी न मारणे एक ना अनेक तक्रारी
समोर येत आहे. या संदर्भात ठिकठिकाणी नागरिक व काम करणारी यंत्रणात तु तु मैं मैं वाद होताना दिसत आहे. मात्र कामावर लक्ष देखरेख असणारी यंत्रणा दिसून येत नसल्याने "भर अब्दुला गुड थैली मे" थातुरमातुर कामे अटोपते घेत कमाई करण्याचे प्रकार तालुक्यात सुरू आहे. खासदार आमदार व विभागा अंतर्गत निधीतून मोठ्या प्रमाणात कामे सुरू असुण झालेल्या व होत असलेल्या विकास कामांची पाहणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी मो.रफीक मो.शब्बीर सामाजिक कार्यकर्ते व सुज्ञ नागरिकांतुन होत आहे.



# निवारा शेडअभावी प्रवासी हैराण; शेड उभारण्याची प्रमोद झरकर यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**चामोर्शी :** आष्टी - गडचिरोली महामार्गावरील येनापूर हे गाव महत्वाचा मानला जातो. तालुक्यातील मध्यभागी असलेल्या येनापूर येथे लक्ष्मणपूर, वायगाव आष्टी, चामोर्शी जाण्यासाठी परिसरातील नागरिकांना येथूनच जावे लागते. परंतु महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून अद्यापपर्यंत येनापूर येथे वाहनांची वाट बघणाऱ्या प्रवाशांना प्रवाशी शेड नसल्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात उन्हाचे चटके सहन करावे लागत आहे. त्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. व वातावरणातील वाढत्या उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत. पावसाळ्याच्या दिवसात तसेच सद्यपरिस्थितीत भंयकर अशा उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये प्रवाशी वर्गाला मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. या उन्हामध्ये वाहनांची वाट बघत राहणाऱ्या अनेक प्रवाशांमध्ये चक्कर येऊन पडण्याची संख्या देखिल वाढलेली आहे. त्यामुळे येनापूर येथे प्रवाशी शेड नसल्यामुळे प्रवाशी वर्गातून नाराजीचे सुर उमटत आहेत.
या येणापूर परिसरातील लोकप्रतिनिधी उन्हात वाहनाची वाट पहात उभे असणाऱ्यांची समस्या लक्षात घेऊन प्रवासी निवारा उभारण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे उन्हात उभे राहून वाहनाची वाट पहात राहणारे प्रवासी सांगतात. या परिसरातील प्रवाशांची समस्या लक्षात घेऊन जनप्रतिनिधी प्रवासी निवारा उभारण्यासाठी प्रयत्न करुन प्रवासी निवारा उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झरकर यांनी केली आहे.



# पक्ष चोराचोरीत दंग महायुती सरकारला शेतकऱ्यांचा विसर

## वडेट्टीवार : दलालांकडून शेतकऱ्यांची लूट सुरूच; तरी सरकार गप्प

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सोयाबीनची खरेदी जागतिक बाजार पेठेवर आधारित असल्याचे सांगितले जात असले तरी केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने खरेदी केली जाऊ नये, असे अपेक्षित आहे. परंतू सोयाबीन असो की, इतर पीकांची खरेदी व्यापाऱ्यांकडून हमीभावापेक्षा कमी दराने केली जात आहे. पण पक्ष चोराचोरीत दंग असलेल्या महायुती सरकारला शेतकऱ्यांचा विसर पडला आहे. अशी परखड टीका करत शेतकऱ्यांचे



आर्थिक हित लक्षात घेता यापुढे सोयाबीन पिकांची खरेदी केंद्रे सुरु करुन सरकारने सोयाबीनची हमी भावाने खरेदी करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, कमी खर्चात येणारे पीक म्हणून सोयाबीनकडे पाहिले जाते. परंतु गेल्या काही वर्षापासून किडीचा प्रादुर्भाव, निसर्गाचा असमतोलपणा, वाढलेली मजुरी, बी – बियाणे व औषधांचे चढे दर यामुळे सोयाबीन शेती परवडणारी राहिलेली नाही. त्यातच किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. तसेच केंद्र सरकारकडून देखील सोयाबीनचा हमीभाव अत्यंत कमी ठरविण्यात आला असून व्यापाऱ्यांकडून देखील सोयाबीनची खरेदी हमीभावापेक्षाही कमी किमतीत केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च देखील भरुन निघत नसल्याची वस्तुस्थिती आहे. तरी देखील सरकार गप्प आहे.

केंद्र सरकारकडून 2022-2023 मध्ये सोयाबीनचा हमीभाव प्रती क्विंटल 4 हजार 300 रुपये तर 2023-2024 मध्ये 4 हजार 600 रुपये ठरविण्यात आला होता. सोयाबीनचा उत्पादन खर्च पाहता हा हमीभाव कमीच आहे. सर्वच व्यापाऱ्यांकडून सोयाबीनची खरेदी हमीभावापेक्षा अत्यंत कमी दरात करण्यात आली असून हे दर 4 हजार रुपयांपेक्षाही खाली आले होते, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. काही दिवसांपासून सोयाबीनला छत्रपती संभाजी नगर येथील बाजार समितीमध्ये 3 हजार 800 रुपये, नागपूर बाजार समितीमध्ये 4 हजार 100 रुपये प्रती क्विटंल एवढा निच्चांकी दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च देखील भरुण निघणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकार विषयी प्रचंड चीड निर्माण झालेली असून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या सरकारला शेतकरी धडा शिकवेल, अशा शब्दात वडेट्टीवार यांनी सरकारला धारेवर धरले आहे.

# नाशिक ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसायांविरोधात कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** नाशिक ग्रामीण जिल्हयातील अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयातील पोलीस ठाणे निहाय अवैध व्यवसायांविरोधात दिनांक ०७/०२/२०२४ रोजी व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईत नाशिक ग्रामीण व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीत अवैध गावठी हातभट्टीची दारू बनविणारी ठिकाणे, त्यामध्ये डोंगर, द-या, नदी, नाले अशा अतिदुर्गम ठिकाणांवर पायपीट करून, त्यांचा शोध घेवून छापे टाकण्यात आले आहे. तसेच अवैधरित्या गावठी दारू, देशी विदेशी मद्याची वाहतूक करणारे वाहने, तसेच विक्रीच्या ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली आहे. तसेच अवैधरित्या अंमली पदार्थांची तस्करी व विक्री करणा-या आणि अवैधरित्या मटका व जुगार चालविणारे व खेळणारे इसमांवर कारवाई देखील कारवाई करण्यात आली आहे. जिल्हयातील सर्व अवैध व्यवसाय हद्दपार करण्यासाठी अशा व्यवसायांची माहिती पोलीसांना कळवावी असे आवाहन पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी केले आहे.

# माता रमाई जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते बोअरवेलचे रमाईनगरात लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** गेल्या काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे धुळे दौरा असताना इर्शाद भाई जहागीरदार यांच्या मागणीनुसार त्यांनी या ठिकाणी 50 बोरवेलचे डिजिटल पद्धतीने उद्घाटन केले होते. त्याच बोरवेलचा लोकार्पण सोहळा माता रमाई जयंतीच्या निमित्ताने पहिलेच बोरवेल लोकार्पण साक्री रोड येथील रमाई नगर येथे संपन्न झाला.

रमाई नगर ह्या परिसरात गोरगरीब नागरिक राहत असल्याने त्या ठिकाणी पाण्याची टंचाई भासत असते त्यामुळे सुचकः आकाश सोनवणे यांच्या मागणीनुसार इर्शाद भाई जहागीरदार यांनी बोअरवेल उपलब्ध करून दिली.७ फेब्रुवारी रोजी माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीचे औचित्य साधून साक्री रोड येथील रमाई नगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मा. ईरशाद भाई जहागीरदार यांनी समाज भवनाच्या जागेवर बोरवेल उपलब्ध करून दिली. या ठिकाणी राष्ट्रवादीचे पदाधिकारी पत्रकार संघाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत यांना अभिवादन करण्यात आले. या ठिकाणी प्रमुख उपस्थिती पत्रकार संघाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कैलास भाऊ चौधरी, मनोज गर्दे, अतुल पाटील, व उपस्तित राजेंद्र चितोडकर, सुरेश आहिरे,समीर खान,वंदना केदार,रंजना इंगळे,संजय आहिरे,रविंद्र इंगळे, चंद्रगुप्त खैरनार, पंकज बागले, प्रदीप बागले, गोकुळ सोनवणे, किरण अहिरे, शुभम धिवरे,धनंजय सोनवणे,रोहित खैरनार, अक्षय पानपाटील आदी नागरिक उपस्तित होते.

# शिवसेना उबाठाकडून मौलाना मुफ्तीच्या अटकेचा राज्यपालांकडे निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** मौलाना मुफ्ती सलमान अझहरी यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करून केलेल्या अटक अटकेच्या विरोधात निवेदनाद्वारे तहसीलदार मार्फत राज्यपालांकडे निषेध व्यक्त. काही दिवसापूर्वी मौलाना मुफ्ती सलमान आझहरी यांनी केलेले भाषण हे केव्हाचे आहे याचा पुरावा नाही त्यांनी केलेल्या भाषणात हमास व इस्रायल युद्धा संदर्भात एक जुना शेर म्हटला त्याचे शब्द "हमसे उलझतेहो अभी तो करबला का आखरी मैदान बाकी है, कुछ देर की खामोशी है फिर वो समा आयेगा, आज कुत्तो का वक्त है कल हमारा दौर आयेगा" हा शेर इजराइलच्या विरोधात म्हटलेला आहे यामध्ये भारतीय वंशाच्या कोणत्याही जाती विषयी धर्माविषयी व्यक्ति विषयी कुठलाही शब्द आलेला नाही परंतु केंद्र सरकार हेतू पुरस्कार धर्मा धर्मामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी अकारण मौलाना मुफ्ती वर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आलेली आहे व ही बेकायदेशीर व घटनाबाह्य आहे घटनेने माणसास आपल्या भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे आणि या शेर मुळे कुणाच्याही धार्मिक अथवा सामाजिक अथवा वैयक्तिक भावना दुखावल्या जात नाही म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तसेच महाविकास आघाडीच्या वतीने या घटनेचा निवेदनाद्वारे तहसीलदारा मार्फत राज्यपालांकडे निषेध नोंदवण्यात आला आहे. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे, तालुकाप्रमुख एड दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, तालुका संघटक कैलास अंभोरे, अल्पसंख्यांक तालुकाप्रमुख सय्यद उमर, अल्पसंख्यांक शहर प्रमुख इकबाल कुरेशी, नगरसेवक तौफिक कुरेशी, डॉक्टर हाफीज जुबेर कुरेशी, श्रीकांत मादनकर, सुदन अंभोरे, तानाजी अंबोरे, सय्यद वाजेद, कलीम कुरेशी, शेख अरबाज, सलमान शेख दादाराव अंभोरे, समाधान मादनकर, गुलाबखा मोहल्ला मजीदचे इमाम शेख हुसेन, शाकिब चौधरी, शेख तनवीर, समीर चौधरी, मदार कुरेशी, शेख सोहेब, शेख आलम, शेख जुनेद, शेख नदीम,यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.



# चंद्रपुरात आजपासून आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

## मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून सिनेरसिकांना मेजवानी!

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय सिनेमा आणि या क्षेत्रात काम करणारी मंडळी दर्जेदार आणि गुणसंपन्न आहे; परंतु जगातील तसेच भारतातील उत्तम चित्रपट चंद्रपूरच्या रसिकांना बघता यावे यासाठी पुणे फिल्म फेस्टिवलच्या धर्तीवर चंद्रपूर फिल्म फेस्टिवल (सिफ) चे आयोजन मागील वर्षीपासून करण्यात आले आहे. येत्या 9 फेब्रुवारी पासून दुसरा तीन दिवसीय चंद्रपूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मिराज सिनेमा येथे सुरू होत असून सिनेरसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.
यावेळी जेष्ठ दिग्दर्शक निर्माते जब्बार पटेल उपस्थित राहणार आहेत. 9 ते 11 फेब्रुवारी 2024 दरम्यान मिराज सिनेमा येथे संपन्न होणाऱ्या या महोत्सवाची "सिनेमा इज़ होप" ही थीम आहे. या उद्घाटन सोहळ्याची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार आहे. उद्घाटन सोहळ्यानंतर 'वल्ली ' (मराठी, दिग्दर्शक – मनोज शिंदे) हा उद्घाटनाचा चित्रपट (ओपनिंग फिल्म) दाखवण्यात येणार आहे. महोत्सवात एकूण देश विदेशातील 17 चित्रपटांचे प्रदर्शन होणार आहे. महोत्सवात दाखवले जाणारे चित्रपट खालील प्रमाणे : वल्ली (दिग्दर्शक मनोज शिंदे), ह्युमनिसट व्यंपायर सिकिंग कन्सेंटिंग स्युसायडिकल पर्सन (दि . एरियन लॉइयस सीज़), द फॉक्स (दि . एड्रियन गॉइजिंगर), इरत्ता (रोहित एम गी कृष्णन), गुड्बाइ ज्युलिया (मोहम्मद कॉर्डोफनी), सिटी ऑफ विंड (लखगवादुलम पुरेवोचिर), द साइरन (सेपीडेह फारसी), लव इज़ फॉर ऑल ( जयप्रकाश राधाकृष्णन), द बर्डेनेड (अमर गमाल), बिहाइंड द माउंटन्स (मोहम्मद बिन अट्टाइ), आर्ट कॉलेज १९९४ - (लुई जैन), भेरा (श्रीकांत प्रभाकर), सिटिज़न सेंट (तीनातीन काजरिशविली), द बुरीटी फ्लॉवर (जाओ साळविज आणि रेणी नाडेर मेसोरा), डेज़र्ट (फाऊदी बेनसैदी), बहादुर (दिवा शाह) आणि जिप्सी ( दिग्दर्शक शशी चंद्रकांत खंदारे)

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# वांगेतुरीच्या जंगलात पोलिस नक्षल चकमक, साहित्य जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**भास्कर फरकडे**

**चार्मोशी :** सीमावर्ती व अतिसंवेदनशील भागात नव्याने उभारणी करण्यात आलेल्या वांगेतुरी पोलिस मदत केंद्रापासून पूर्वेस सात किलोमिटर अंतरावर जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दल आणि नक्षलवाद्यांत जोरदार चकमक झाली. यावेळी नक्षल्यांनी जंगलात पळ काढला. पोलिस दलानी घटनास्थळावरून नक्षली साहित्य जप्त केले. ही घटना दिनांक सात फेब्रुवारी बुधवारी घडली.

काल संध्याकाळी एक विश्वासार्ह माहिती मिळाली की काही सशस्त्र नक्षलवादी कॅडर कांकेर - नारायणपूर - गडचिरोली जाणाऱ्या त्रिकोणी रस्त्याच्या पॉइंटवरील वांगेतुरीपासून 7 किमी पूर्वेला हिदूर गावात विध्वंसक कारवाया करण्यासाठी व नव्याने उघडलेल्या पो.स्टे. वांगेतुरी आणि पो.म. के. गर्देवाडा या आउट पोस्टची रेकी करण्याच्या उद्देशाने तळ ठोकून आहेत. त्यावरून मा अप्पर पोलीस अधीक्षक अभियान श्री. यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली चार C-60 पार्ट्यांचा समावेश असलेले एक पथक सदर भागात शोध मोहिमेवर पाठवण्यात आले सदर पथक हिदूर गावापूर्वी 500 मीटर अंतरावर असताना त्यांचेवर सुमारे 19:00 वाजता जोरदार नक्षल्यांकडून गोळीबार करण्यात आला त्याला गडचिरोली पोलीस दलाने प्रत्युत्तर दिल्यावर घनदाट जंगल आणि अंधाराचा फायदा घेत नक्षलवादी पळून गेले. परिसरात झडती घेतली असता - पिट्टू, स्फोटक साहित्य, वायरचे बंडल, आयईडी बॅटरी, डिटोनेटर्स, क्लेमोर माइन्सचे हुक, सोलर पॅनेल आणि नक्षल साहित्य इत्यादी मिळून आल्याने ते जप्त करण्यात आले आहेत. त्या भागात नक्षलविरोधी अभियान राबवले जात आहे.



# सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावा : डॉ. पी.पी. वावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग नवी दिल्लीचे सदस्य मा.डॉ.पी.पी. वावा यांच्या अध्यक्षतेखाली ७ फेब्रुवारी रोजी चंद्रपूर महानगरपालिका राणी हिराई सभागृह येथे सफाई कर्मचारी यांच्या विविध विषयांवर आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न नियमानुसार मार्गी लावण्याचे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीस डॉ.वावा यांच्यासह सल्लागार श्री.नाथ,मनपा आयुक्त श्री. विपीन पालीवाल,अतिरिक्त आयुक्त श्री. चंदन पाटील,बल्लारपूर,ब्रह्मपुरी,मुल नगर परिषद यांचे मुख्याधिकारी, उपायुक्त श्री. मंगेश खवले,श्री. उमेश पिंपरे,राष्ट्रीय अध्यक्ष,महादलित परिसंघ, श्री. वीरेंद्र नाथ, सामाजिक कार्यकर्ता तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थीत होते. दरम्यान, मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांनी डॉ. वावा यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी डॉ.वावा यांनी सफाई कर्मचाऱ्यांचे कामाचे कौतुक केले. सफाई कर्मचाऱ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ मिळावा व शासनाद्वारे वेळोवेळी काढण्यात आलेले जीआर यांची अंमलबजावणी करण्यात यावी. कामगारांना कठीण समस्यांना सामोरे जावे लागणार नाही तसेच हक्कापासून सफाई कामगार वंचित राहणार नाहीत, याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत स्वच्छता विभाग प्रमुख डॉ.अमोल शेळके यांनी पावर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे मॅन्युअल स्कॅव्हेंजर कायदा २०१३ च्या अंमलबजावणीबाबत मनपा करीत असलेल्या प्रयत्नांचाही माहीती दिली त्याचप्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांना पक्के घरे उपलब्ध करण्यासाठी मनपा प्रयत्नरत असुन याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असल्याचीही माहीती याप्रसंगी देण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली,कर्मचाऱ्यांनी आरोग्य शिबिराची मागणी केली असता आरोग्य शिबिरे यापुर्वीही आयोजित केली गेली आहेत मात्र कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार त्यांच्या भागात आरोग्य शिबीर घेण्यात येणार असल्याचे मनपाद्वारे सांगण्यात आले.

# विनोद वाईन्स हटवण्याची कार्यवाही तातडीने करावी : शंभुराजे देसाईंचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आझाद समाज पार्टीच्या वतीने गेल्या दोन महिन्यांपासून धुळे शहरातील मध्यवर्ती भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान हटवावे यासाठी आंदोलन करण्यात येत आहे. दि.१ फेब्रुवारी पासून आझाद समाज पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आनंद लोंढे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे. दि.३ फेब्रुवारी रोजी उपोषणस्थळी आ.फारुख शाह यांनी भेट देवून उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांना पाठिंबा दिला होता आणि आंबेडकरी जनतेच्या भावनेशी खेळणाऱ्या विनोद वाईन्सचा कायमचा निकाल लावण्यासंदर्भात मंत्रालयीन पातळीवर प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले होते.त्यानुसार गुरुवारी मंत्रालयात शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री महोदयांच्या मंत्रालयीन दालन क्र.३०२,मुख्य इमारत, ३रा मजला येथे बैठक संपन्न झाली.या बैठकीस आ.फारुख शाह,जिल्हाधिकारी धुळे,(व्हिडिओ कॉन्फरन्सिंग)पोलीस अधिक्षक, (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग)धुळे, मुकुंद शिरसाठ, मुकुंदराव शिरसाठ,ॲड. सुमित साबळे.जितेंद्र निकाळजे,कैलास जैस्वार आणि उपोषणकर्ते आझाद समाज पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आनंद लोंढे हे धुळे येथील उपोषण स्थळावरून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभागी झाले. या बैठकीत विनोद वाईन्स संदर्भात चर्चा करण्यात येवून आ.फारुख शाह यांनी धुळ्यातील आंबेडकरी जनतेच्या तीव्र



भावना मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिल्या तर उपोषणकर्ते आनंद लोंढे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कुठल्याही शासननिर्णयापेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे पावित्र्य मोठे आहे. त्यामुळे शासनाने हे दुकान हटविलेच पाहिजे असे मत मांडले. बैठकीत सहभागी सर्वांचे म्हणणे ऐकून मद्यविक्री दुकान १० दिवसांकरिता बंद ठेवण्यात यावे आणि आणि दि.९ रोजी अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क, धुळे आणि जिल्हाधिकारी धुळे यांनी दुकान मालकाला पाचारण करून मद्यविक्री दुकान स्थलांतरित करण्याची कार्यवाही तातडीने करावी असे आदेश ना.शंभूराज देसाई यांनी दिले. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ असलेले मद्यविक्री दुकान त्याठीकाणाहून हटविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.याबैठकीत धुळे येथील उपोषणस्थळावरून संतोष अमृतसागर, भैय्यासाहेब वाघ, राज चव्हाण, आनंद सैंदाणे, मुकेश खरात, आसिफ शाह, संजय अहिरे, विनोद केदार, भैय्यासाहेब वाघ, किरण भालेराव, दावल वाघ, चिंतामण थोरात, मुकेश वाघ, डॉ.शरद भामरे, अरविंद निकम, दिनेश निकूंभे, आदी सहभागी झाले होते.विनोद वाईन्स हटविण्याचा मार्ग मोकळा झाल्यामुळे धुळे जिल्ह्यातील आंबेडकरवादी जनतेने आनंद व्यक्त केला आहे.



# शिवसेना भवन येथे माता रमाई जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शिवसेना भवन लोणार येथे माता रमाई यांची वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ.गोपाल बशिरे सुदन अंभोरे, गजानन जाधव सर यांनी माता रमाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. बाबासाहेबांना रमाई चे पाठबळ रमाईचा त्याग रमाई चे बलिदान या विषयांवर भाष्य करण्यात आले माता रमाईच्या छायाचित्राचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे सह, शहर प्रमुख गजानन जाधव सर, उपशहर प्रमुख लूकमान कुरेशी, तालुका संघटक कैलास अंभोरे, नगरसेवक श्याम राऊत, अविनाश सुरझुसे, तालुकाप्रमुख उमर सय्यद, शहर प्रमुख इकबाल कुरेशी, शहर संघटक तानाजी मापारी, विभाग प्रमुख सुदन अंभोरे सर, विभाग प्रमुख तानाजी अंभोरे, युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, साकिब चौधरी, शेख तनवीर, समीर चौधरी, मदार कुरेशी, शेख शोहेब, शेख असलम, शेख नदीम, सय्यद वाजेद, कलीम कुरेशी, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# बसमध्ये 'तो' बॉंब नसून अग्निशमन यंत्र; बॉंबसदृष्य वस्तू ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानकावर गडचिरोलीतून आलेल्या एका बसमध्ये बॉम्ब असल्याची माहिती मिळाल्यानंतर बॉम्ब शोधक-नाशक पथकाने बॉम्बसदृष्य वस्तू ताब्यात घेतली. सुराबर्डी येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले. मात्र, डेपो व्यवस्थापकाने चालकाला फोन करून माहिती घेतली असता ती वस्तू बॉम्ब नसून केवळ आग विझविण्याचे लहान आकाराचे अग्निशमन यंत्र (फायर इंस्टींग्युटर) असल्याचे सांगितले. त्यामुळे बॉम्ब शोध व नाशक पथक, श्वान पथक, दहशतवाद विरोधी पथक, गुप्तचर यंत्रणा आणि गणेशपेठ पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

# स्कूल कनेक्ट संपर्क अभियानातून 'एनईपी'ची जनजागृती अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी सर्वदूर सुरु आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये होणाऱ्या शैक्षणिक बदलांबाबत व त्याच्या सकारात्मक परिणामांबाबत कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती होण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या वतीने "स्कूल कनेक्ट" (एनईपी कनेक्ट) हे संपर्क अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान राबविण्यासाठी शासनाने राज्यातील विद्यापीठांना सुचित केले आहे. याच अनुषंगाने हे अभियान राबविण्यासाठी व विद्यार्थ्यांना याविषयी ज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबईने पुढाकार घेतला आहे. एसएनडीटी महिला विद्यापीठाचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर तर्फे चंद्रपूर जिल्ह्यात "स्कूल कनेक्ट" (NEP कनेक्ट) संपर्क अभियान सुरू करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या बल्लारपूर आवारा तर्फे या माध्यमातून एनईपी विषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. या अभियानाला चंद्रपूर जिल्हयातील शहरी भागासोबतच अतिशय दुर्गम तालुक्यातील यामध्ये गडचांदूर, राजुरा, पोंभुर्णा, गोंडपींपरी, बल्लारपूर आणि चंद्रपूर मधील ३५ कनिष्ठ महाविद्यालयांत राबविण्यात आले आहे. ज्यामध्ये ५००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील बदलांबाबत व त्याच्या सकारात्मक परिणामांबाबत माहिती देण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भाने हे नाविन्यपूर्ण स्कूल कनेक्ट संपर्क अभियान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या मार्गदर्शनात पार पडले असून यात बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांच्या नेतृत्वात, सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड, समन्वयक वेदानंद अलमस्त, प्रा. खुशबू जोसेफ, नेहा गिरडकर, अश्विनी वाणी, श्रुतिका राऊत आणि शीतल बिल्लोरे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी स्नेहा लोहे, ममता भेंडे, आशिष नुगुरवार, वैशाली बोमकंटीवार यांनी परिश्रम घेतले.

**स्कूल कनेक्ट अभियानाची वैशिष्ट्ये**

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मधील विद्यार्थीकेंद्री बदलांविषयी आणि त्यांच्या हितकारक परिणामांविषयी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणे. विद्यापीठांनी तयार केलेल्या अनुभवाधिष्ठित, बहुविद्याशाखीय लवचिक अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती देणे. मूल्यमापनातील श्रेयांक पद्धती आणि त्यामुळे आलेली लवचिकता समजावून सांगणे. शिक्षण अर्धवट सोडून रोजगाराकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांना मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या संधींविषयी माहिती देणे, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे. विद्यार्थ्यांकरिता असलेल्या शिष्यवृत्ती विषयी सविस्तर माहिती देणे. विद्यापीठाच्या विद्यार्थी सहायता कक्षाविषयी माहिती देणे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध असलेल्या संधींविषयी माहिती देणे.

# येणापूर परिसरातील सरपंचांचा संकल्प यात्रेवर बहिष्कार

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**चामोर्शी :** भारत सरकारने प्लानशिप योजनेचा लाभ लक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रामस्वराज्य अभियान व विकसित भारत संकल्प यात्रा चामोर्शी तालुक्यातील येनापूर परिसरातील ग्रामपंचायतींमध्ये येणार आहे. मात्र या यात्रेवर तालुका ग्रामसंवाद सरपंच (संघ) असोसिएशनच्यावतीने बहिष्कार टाकण्यात येणार आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदारांना सादर करण्यात आले.



6 ते 9 फेब्रुवारीदरम्यान आयोजित विकसित भारत संकल्प यात्रेवर ग्रामपंचायत सोमनपल्ली, कोनसरी, जैरामपुर, मुधोली तुकुम, मुधोली चक क्र. 2, मुधोली रिठ, दुर्गापूर, अड्याळ, गणपूर या ग्रामपंचायतींनी बहिष्कार टाकला आहे. संकल्प यात्रा विविध ग्रामपंचायतींमध्ये येणार असून त्याचे नियोजन करण्याचे पत्र शासनाने काढले. परंतु चामोर्शी तालुक्यातील येनापूर परिसरातील ग्रामपंचायतींचे किंवा ग्रामस्थांचे कोणतेही मत जाणून न घेता शेतकऱ्यांची शेतजमीन औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केली. जमीन अधिग्रहण करण्याबाबत शासन निर्णय पारित केला. शासन संबंधित ग्रामपंचायतींचे म्हणणे ऐकूण घेण्यास तयार नाही. त्यामुळे शासन प्रतिनिधी किंवा शासनाच्या कोणत्याही कार्यक्रमात भाग घेणार नाही, असा निर्णय ग्रामपंचायतींनी घेतला आहे. या परिसरातील सर्व ग्रामपंचायतींमधील नागरिक मुख्यमंत्री सशक्तीकरण व विकसित भारत संकल्प यात्रेत सहभागी होणार नसून स्वागतही करणार नाहीत. तसेच कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होणार नसल्याचे निवेदनात नमूद केले. निवेदन देताना सोमनपल्लीचे सरपंच निळकंठ निखाडे, कोनसरीचे सरपंच श्रीकांत पावडे, गणपूरचे सरपंच सुधाकर गद्दे, जयरामपूर सरपंच दिपाली सोयाम, मुधोली तुकुमचे सरपंच शकुंतला डाकोटे, मुधोली चक क्र. 2 चे सरपंच अश्विनी कुमरे, मंगलदास आत्राम, अड्याळ सरपंच स्वाती टेकाम, दुर्गापूर सोनी मंडल, एम. एल. आत्राम उपस्थित होते.

# एकनाथ शिंदे यांचा धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथे शिवसेनेचा संकल्प मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेचा संकल्प मेळावा हा तालुक्यातील ढोकी येथील तेरणा सहकारी साखर कारखान्याच्या प्रांगणात बुधवारी दुपारी पार पडला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणामध्ये पालकमंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या कामाचे कौतुक करत माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, या दाढीकडे तुमच्या नाड्या आहेत. मला हलक्यात घेऊ नका, यानंतर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्याचे ढोकी येथील कार्यक्रमात कौतुक केले.



पालकमंत्री तानाजी सावंत यांनीही धाराशिव जिल्ह्याचे खासदार यांच्यावर टीका करताना ज्याची ग्रामपंचायत सदस्य होण्याची लायकी नव्हती त्याला खासदार केले अशा शब्दात खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर टीका केली.

धाराशिव शहराच्या विकासाला मिळालेल्या 154 कोटी निधीवरून धाराशिव शहरात लावलेले भाजपाचे आमदार राणा दादा पाटील यांचे बॅनर यावरही त्यांनी निशाणा साधला.

यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत ही महायुती टिकणार का ? याबाबतही कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम अवस्था होती.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या आगमन प्रसंगी पालकमंत्री प्रा. डॉ.तानाजीराव सावंत व आमदार ज्ञानराज चौगुले यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी माजी खासदार रवींद्र गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे व जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुळकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलीसांनी यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांना मानवंदना दिली.



# यात्रांमध्ये उघड्यावरील पशूबळी विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** नाशिक जिल्ह्यात विविध दैवतांच्या किमान दहा ठिकाणी जत्रा - यात्रांमधून नवसपूर्ती व परंपरेचा आणि धर्माचा भाग म्हणून मोठ्या प्रमाणात पशूपक्षी बळी देण्याची अनिष्ट, अघोरी प्रथा आजही पाळली आणि जोपासली जाते आहे. हा उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असून या कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी याबाबत अंनिसने निवासी जिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना निवेदन दिले आहे.

उघड्यावर पशूबळी विरोधात शासनाने संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करावी असा सक्त आदेश उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक २३ जुलै १९९८ रोजी शासनाला दिलेला आहे. मात्र वारंवार सांगूनही त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होताना दिसत नाही. नवसपूर्तीचाच भाग म्हणून सार्वजनिक रस्त्यावरून लोटांगण, दंडवत घालणे, लोखंडी हूक पाठीच्या त्वचेला टोचून, गळ खेळणे असे अघोरी आणि अमानुष प्रकारही घडताना दिसतात. असे प्रकार करण्यात महिलांची संख्या मोठी असते. स्त्री जीवनाला अशी प्रथा कलंक आहे. शिवाय जत्रा यात्रांमधून अपघात, चोऱ्या, अनारोग्य, व्यसनांना मोकळीक, वाहतुकीची समस्या अशा अनेक सामाजिक समस्या, गैरप्रकार अचानक गंभीर रूप धारण करतात. जत्रा - यात्रांमधील हे अनिष्ट, अघोरी, अमानुष प्रकार थांबवण्यासाठी महाराष्ट्र अंनिस मागील २७ वर्षांपासून प्रबोधन - सत्याग्रह - संघर्ष या मार्गाने प्रयत्न करीत आहे. नवसापोटी पशूपक्षी बळी देऊ नयेत. ते संत - समाज सुधारकांच्या विचारांशी विसंगत आहे. अशा अनिष्ट, अघोरी प्रकारांतून व्यक्ती, कुटुंब, समाज यांच्या आर्थिक शोषणासोबतच ते दैववादी बनत जातात, मानसिक गुलामीत अडकत जातात. संघटनेच्या प्रबोधनपर प्रयत्नांतून काही अंशी ही अनिष्ट प्रथा थांबविण्यात संघटनेला यश मिळालेले आहे. मात्र, अजूनही जत्रास्थळी उघड्यावर मोठ्या प्रमाणात पशूबळी दिले जातात. याबद्दल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी अवगत केलेले आहे. ' नवसापोटी पशूपक्षी बळीला प्रतिबंध' असा ठराव संबंधित ग्रामपंचायतींनी करून तो प्रसिद्धीस द्यावा आणि जत्रास्थळी तसेच गावामध्येही तो कायमस्वरूपी लावावा, असे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करून संबंधितांना तातडीने पाठवावेत अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, नाशिक शहर कार्याध्यक्षा प्रा. आशा लांडगे, कार्यकर्ता प्रल्हाद पवार आदींच्या सह्या आहेत.



# व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीधर पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथील दैनिक सकाळचे पत्रकार श्रीधर पाटील यांची व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी तर खुलताबाद तालुका अध्यक्षपदी महाराष्ट्र टाइम्स चे पत्रकार विजय चौधरी यांची निवड करण्यात आली. श्रीधर पाटील यांना जिल्हा परिषद आदर्श माध्यमिक शिक्षक राष्ट्रीय पत्रकार भूषण नाशिक जिल्हा समाज रत्न भूषण 1981 प्रथम बाजार सावंगी येथे बस नसताना सर्व त्यांनी सुरू केले बाजार सांगवी येथे पत्रकार घडवणारे सर्वप्रथम दैनिक पेपर चालू करणारे श्रीधर पाटील सर वेरूळ येथील हॉटेल कैलास मध्ये समारंभ झाला यावेळी संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, जिल्हा अध्यक्ष सतीश रेंगे, जिल्हा महासचिव अमित फुटाणे, जिल्हा संघटक इस्त्रार चिस्ती, संभाजीनगर शहराध्यक्ष रवी माताडे यांचेसह तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी व सदस्यांची उपस्थिती होती. वाईस ऑफ इंडिया संघटना एक पंचसूत्री घेऊन पत्रकारांच्या हितासाठी झटणारी आहे देशाच्या 21 राज्यात ही संघटना काम पाहत आहे. तालुका कार्यकारिणी कार्याध्यक्षः उदय खरोटे उपाध्यक्षः रामलाल निंभोरे कली मुद्दिन शेख सरचिटणीस सय्यद इरफान, सहसचिव संतोष करपे, कोषाध्यक्ष रमेश माळी, कार्यवाहक सलमान खान, संघटक बाबासाहेब दांडगे, प्रसिद्धी प्रमुख नावेद शेख यांच्यासह बशीरुद्दीन, श्रीधर पाटील, रमेश अधाने, सुभाष शिंदे, अशोक अधाने यांचीही निवड झाली. यावेळी बाजार सावंगी चे पत्रकार दैनिक आधुनिक केसरी जिल्हा ग्रामीण प्रतिनिधी सुधाकर जेठे, दैनिक सामना सचिन गवळी, दैनिक मराठवाडा साथी विनोद नलावडे यांची उपस्थिती होती.




# गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).

आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

## नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# क्रांती आरसूड बनली क्लास वन अधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** क्रांती प्रभाकर आरसूड हिने लोकसेवा आयोग २०२२ मध्ये झालेल्या स्पर्धा परीक्षेत राज्यातून अनुजाती मुलींमध्ये व्दितीय क्रमांक घेऊन क्लास वन अधिकारी झाली. प्राथमिक शिक्षण बदनापूर तालुक्यात जि. प. शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण वेणूताई चव्हाण हायस्कूल, एन-८, छत्रपती संभाजीनगर येथे झाले. इंजिनियरिंग इटिसीमध्ये शासकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे झाले. मूळची वाहेगाव, ता. बदनापूर, जि. जालना येथील असून सध्या ती सिडको एन ६ सिंहगड कॉलनी येथे राहते. वडील प्रभाकर उत्तमराव आरसूड व आई वंदना रामदास शिंदे आरसूड जि. प. शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. संघर्ष, चिकाटी, ध्येयनिष्ठ व सातत्य पूर्ण अभ्यास यामुळे मी हे यश संपादन केले. मुलीना संधी देणे आवश्यक आहे. मुलींनी पुढे येऊन स्पर्धा परिक्षेची पूर्वतयारी करावी व अधिकारी व्हावे, असे क्रांती हिने सांगितले.



# कत्तलीसाठी भरदिवसा गोवंशाची अवैध वाहतूक

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील सोमवार आठवडी बाजार असून या बाजारांमधून हजारो वर्ष पिकप टेम्पो, आईशर यांच्या साह्याने कोंबून गोवंश भरतात. गोवंशाची अवैध रीतीने वाहतूक होते त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा गोवंश वाहतुकीचा परवाना नसताना भर दिवसा थोडी बाजारांमधून गोवंश कत्तलीसाठी जात असून यावर संबंधित अधिकारी कुठलेही कारवाई करत नाही यामध्ये गोवंश आठवडी बाजारामधून गोवंश खरेदी करून दिवसभर चारा पाणी न देता झाडाला बांधून ठेवल्या जातात. त्यानंतर संध्याकाळच्या वेळेत पिकप आईसर टेम्पो लावून ते गोवंशी येता येते वडोद बाजार ते जातेगाव मार्गाने व वडोद बाजार ते पिरबावडा मार्गे वाहनामध्ये दाटी करून नेले



जातात. त्यामध्ये गोवंश गाडीमध्ये जोरजोऱ्याने ओरडतात हे संबंधित अधिकाऱ्यांना कळत नाही का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये व गोप्रेमी मध्ये होत आहे. यावर वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन सनी कत्तलीसाठी जाणारे गोवंश वाचवण्याची मागणी होत आहे जर कोणी कत्तल साठी जाणारे गोवंशाची खबर व बातमी लावल्यास त्याला पाहून घेऊ अशा धमक्या देतात. सदरील गोवंश वाहतुकीचा कुठलाही परवाना नसताना बिनधास्तपणे फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे आठवडी बाजारामध्ये गोवंश कत्तलीसाठी सप्लाय होतात. तरी त्यावर वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन सनी गोवंश वाहतुकी करणाऱ्या वाहनावर कारवाईची मागणी होत आहे.

कायदा वंश २०१५ (सुधारित )अनुसार कारवाई करण्याची मागणी होत आहे.क़ायदेची अमल बजवनी करुन आपण सर्व मानक प्राणी कल्याण अधिकारी आणि गौरक्षक कार्यकर्ता करणार गौवंश हत्या मुक्त महाराष्ट्र पूर्ण महाराष्ट्रात मानक प्राणी कल्याण अधिकारी, गौरक्षक कार्यकर्ता (स्वयंसेवक), आणि सर्व पोलिस अधिकारी यांच्या साठी महाराष्ट्र पोलिस महासंचालक कार्यालयाने प्रस्तुत केलेली मानक कार्य प्रणाली प्रक्रिया हे सर्व कार्यकर्त्यासाठी कायद्याची गीता आहे. अवश्य सर्वांनी वाचावे. जेव्हा गौरक्षा विषयात फिर्याद नोंदविन्यास पोलिस अधिकारी नकार देतात किंवा तुम्हाला (कार्यकर्ताना) काय अधिकार आहे? आणि कार्यकर्तायावर खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जाते तेव्हा कार्यकर्त्यांनी खुप नम्रतेने एसओपी ची प्रत अधिकार्याच्या हातात देउन पोलिस महासंचालक कार्यालयने जारी केलेली एसओपी चे पालन करण्यासाठी विनंती करावी. असे केल्यावर शत प्रतिशत पोलिस अधिकारीयाना महाराष्ट्र पशु संवर्धन क़ायदा २०१५ आणि इतर गुन्हे अंतर्गत फिर्याद नोंद वावी लागेल, आणि कायद्याचे पालन करून महाराष्ट्राचे पशुधन वाचविनण्याचा आपला मुख्य हेतु साध्य करण्यात यश मिळेल. फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील आठवडी बाजारामध्ये भर दिवसा व रात्रीच्या वेळी हजारो गोव्याचे कत्तलीसाठी जातात त्यांच्यावर कारवाई होण्याची मागणी परिसरातून होत आहे.

# वनविभागाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याने योगाजी कुडवे यांनी सुरू केले ठिय्या आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**गडचिरोली :** भामरागड वनविभागांतर्गत गट्टा वनपरिक्षेत्रात रस्तेबांधणीचे काम सुरू झाले आहे. या रस्त्याच्या बांधकामासाठी गिट्टी,आणि माती इत्यादी वन विभागाच्या जागेवरून वापर केला जात आहे. याला वनविभागातील अनेक अधिकारी व कर्मचारी जबाबदार असल्याचा आरोप करत त्यांच्या निलंबनाची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते योगाजी कुडवे यांनी स्थानिक मुख्य वनसंरक्षक कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. या संदर्भात मुख्य वनसंरक्षक तसेच राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व वनमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले आहे. कुडवे म्हणाले की, भामरागड वनविभागाच्या गट्टा वनपरिक्षेत्रांतर्गत मेढरी ते गट्टा या रस्त्याचे काम सुरू झाले आहे. या रस्त्याच्या कामासाठी वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणात खडी खोदाई सुरू झाली आहे. मेढरी, वांगेतुरी, गर्देवाडा जंगलात व रस्त्याच्या कडेला जेसीबीच्या साहाय्याने खोदाईचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून सदरील माती, खडी रस्त्यावर टाकली जात आहे. असे असतानाही वनविभागाच्या



एकाही अधिकाऱ्याने कोणतीही कारवाई न करून ठेकेदाराला मोकळीक दिली असून, त्यामुळे वनसंपत्तीला धोका निर्माण झाला आहे. जंगलात 20/25 ठिकाणी मोठमोठे खड्डे करून हजारो ब्रास खोदण्यात आले आहेत. असे असतानाही वनरक्षक, वनपाल, वन परिक्षेत्र अधिकारी, सहायक वनसंरक्षक, उप वनसंरक्षक भामरागड यांनी कोणतीही कारवाई न केल्याने वनविभागाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. वरील मागणीबाबत सामाजिक कार्यकर्ते योगाजी कुडवे यांच्या नेतृत्वाखाली मुख्य वनसंरक्षक कार्यालयासमोर दिनांक ०७ फेब्रुवारी पासून ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आंदोलनात रवींद्र सेलोटे, चंद्रशेखर सिडाम, नीळकंठ संदोकार, आकाश मट्टामी, धनंजय डोईजड, रघुनाथ सिडाम, ईश्वर तिवाडे, राजू गडपायले, विलास भानारकर, आशिष नक्षीने, अरविंद देशमुख आदी उपस्थित आहेत.

# राज्याच्या काही भागात पावसाचे सावट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा ओघ कमी झाल्यामुळे राज्याच्या अनेक भागातून थंडीचा प्रभाव कमी झाला आहे. तसेच कमाल तापमानात वाढ होऊन उन्हाळ्याची चाहूल सुद्धा लागली आहे. मात्र, त्याचवेळी आता विदर्भ आणि मराठवाड्यासह राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाचा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे. उत्तर भारतात यावर्षी कडाक्याची थंडी होती. परिणामी उत्तरेकडील थंड वाऱ्याचा परिणाम महाराष्ट्रात देखील जाणवला. आता उत्तरेकडील थंडी कमी झाल्यामुळे राज्यातील अनेक भागातून थंडीने सुद्धा काढता पाय घेतला आहे.

थंड वाऱ्यामुळे रात्री आणि पहाटेच्या सुमारास हलका गारवा जाणवत आहे. तरीही किमान तापमानसह कमाल तापमानातसुद्धा वाढ होत आहे. त्यामुळे आता दिवस उन्हाचे हलके चटके जाणवू लागले आहेत.दरम्यान, आजपासून महाराष्ट्रासह इतरही काही राज्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात ढगाळ वातावरणासह शुक्रवारी हलक्या पावसाचा अंदाज आहे. पूर्व विदर्भ ते तेलंगणा, कर्नाटक पर्यंत कमी दाबाचा पट्टा कायम असल्याने विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाला पोषक वातावरण आहे. तर आजपासून अरुणाचल प्रदेशसह पश्चिम बंगाल, नागालँड, मेघालय, आसाम,त्रिपुरा, मिझोराम, मणिपूर याठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नऊ ते अकरा फेब्रुवारी दरम्यान उत्तर भारतात पावसाची शक्यता आहे.




# दाक्षायणी विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**रांजणगाव :** दाक्षायणी विद्यामंदिर रांजणगाव शें.पुं ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी शालेय जीवनात जसे पुस्तकी ज्ञान गरजेचे असते.त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा.या अनुषंगाने सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी लहान चिमुकल्यांनी गाण्याच्या बोलावर थिरकली. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटक मा.श्री संदीप शिंदे साहेब (पी. एस. आय वाळूज) व मा.श्रीमती.स्वाती उचित मॅडम (पी.एस.आय. वाळूज) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.सुभाष पा.मोटे विशेष उपस्थिती श्रीमती योगितताई प्रभाकर महालकर (सरपंच रांजणगाव शे.पू) प्रमुख अतिथी रमणिक भाई पटेल, दत्तू पतील मोटे, श्रीमती उषाताई दत्तू हिवाळे, योगेश पाटील मोटे, अशोक जाधव (ग्रामपंचायत सदस्य), प्रमुख पाहुणे साईनाथ जाधव, जावेदभाई सय्यद,कविता हिवाळे, शरदभाऊ किर्तीकर, कृष्णा जोशी, सौ.दिपाली मोटे, मुख्याध्यापक बापूसाहेब जाधव, सुदामभाऊ वरकड, रामविनय चौधरी, गणेश वरकड, गजानन दिग्रसकर, विशाल ठेंग, श्रीमती. डाके मॅडम, श्रीमती वाघ मॅडम हरी मोहिते, भाऊराज ढवळे, शिक्षक वृंद तसेच मोठ्या संख्येने पालक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर